नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २८७ * * अकोला * रविवार, दिनांक १३ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## ईडी जप्त करणार ६६१ कोटींची मालमत्ता

नॅशनल हेराल्ड प्रकरण

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** काँग्रेसच्या नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडशी संबंधित मनी लॉड्रिंग प्रकरणाच्या चौकशीदरम्यानची मालमत्ता जप्त केली जाईल. ईडीने शनिवारी एका निवेदनात म्हटले आहे की, त्यांनी ६६१ कोटी रुपयांच्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी नोटीस बजावली आहे.

पीएमएलए कायद्याच्या कलम ८ आणि असोसिएटेड रूल्सच्या नियम ५(१) नुसार, ईडीने या मालमत्ता असलेल्या मालमत्तांच्या संबंधित रजिस्ट्रारकडे कागदपत्रे सोपवली आहेत. ईडीने ताब्यात घ्यायची जागा रिकामी करण्याची मागणी केली आहे.

## थोडक्यात

### २ नक्षलवादी ठार

■ **दंतेवाडा :** छत्तीसगडमधील दंतेवाडा-विजापूर सीमेवरील भैरमगड परिसरात पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. सकाळी ९ वाजल्यापासून दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू होता. ज्यामध्ये सैनिकांनी २ माओवाद्यांना ठार मारले आहे. दोघांचेही मृतदेह आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

दंतेवाडा जिल्ह्याचे एसपी गौरव राय म्हणाले की, विजापूरच्या इंद्रावती भागातील जंगलात माओवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाली होती, त्यानंतर सुमारे ४०० सैनिकांना कारवाईसाठी पाठवण्यात आले. २०२५ मध्ये आतापर्यंत सैनिकांनी १४६ नक्षलवाद्यांना ठार मारले आहे.

### २२ राज्यांमध्ये वादळाचा इशारा

■ **नवी दिल्ली :** मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशसह देशातील २२ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा आहे. ईशान्येकडील आसाम, मेघालय, अरुणाचल आणि इतर राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

राजस्थानपासून आंध्र किनार पट्टीपर्यंत वातावरणाच्या खालच्या थरात द्रोणीय रेषा पसरली असून, ही रेषा विदर्भावरून जात आहे. यामुळे उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्र वगळता राज्यात मेघगर्जनेसह पावसाचा यलो अलर्ट मुंबई हवामान विभागाने दिला आहे. १३ एप्रिल रोजी धाराशिव, लातूर, नांदेड, सोलापूर, तर १४ एप्रिल रोजी राज्यातील दक्षिणेकडील सर्व जिल्ह्यात आणि १५ एप्रिल रोजी वर्धा आणि यवतमाळ मध्ये मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवलेली आहे.

१५ एप्रिलपर्यंत मध्य प्रदेशात तीव्र उष्णता आणि उष्णतेच्या लाटेचा कोणताही इशारा नाही. ३ जिल्ह्यांमध्ये गारपीट होऊ शकते. यासोबतच हलका पाऊस देखील पडू शकतो.

## स्वतःला आलमगीर म्हणणाऱ्याची
# कबर महाराष्ट्रातच

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १२ :** स्वतःला 'आलमगीर' समजणारा औरंगजेब ज्याने हिंदवी स्वराज्याचा कट रचला, त्याची कबर महाराष्ट्रातच आहे. पण ही शिवभूमी आहे, इथे औरंगजेबाचे विचार चालणार नाहीत,ह्वअशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी औरंगजेब समर्थक प्रवृत्तींवर सडकून टीका केली.

शहा यांनी रायगडावर झालेल्या कार्यक्रमात भाषण करताना स्पष्ट इशारा दिला की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. अमित शहा यांनी आज रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमात भाषण करताना राजकीय आणि सामाजिक मुद्द्यांवर महत्त्वपूर्ण वक्तव्ये केली. त्यांनी महापुरुषांच्या अवमानाला रोखण्यासाठी कठोर कायदा



आणण्याची घोषणा केली, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरव करत रायगडच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला.

शहा यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाला सलाम करत त्यांचा आदर्श संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. रायगड हा मराठा साम्राज्याच्या समृद्ध इतिहासाचा साक्षीदार आहे. शिवाजी महाराजांचे शौर्य, नावीन्य आणि स्वराज्याची संकल्पना ही केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून, ती राष्ट्रीय पातळीवर प्रेरणा देणारी आहे, शिवाजी महाराजांचा वारसा जपण्यासाठी रायगडला प्रेरणास्थळ बनवू, रायगड किल्ल्याच्या संवर्धन आणि विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकार पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे शहा यांनी स्पष्ट केले.

## स्फोटानंतर लागलेल्या आगीत
# ५ कामगारांचा मृत्यू



### उमरेड एमआयडीसीमधील घटना : १५ ते २० जखमी

■ **महासागर प्रतिनिधी उमरेड / नागपूर, दि. १२ :** नागपूर जिल्ह्यातील उमरेड एमआयडीसी मध्ये ॲल्युमिनियम फॉइल बनवणाऱ्या कंपनीत शुक्रवारी रात्री लागलेल्या आगीनंतर झालेल्या स्फोटात ५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत १५ ते २० कामगार जखमी झाले असून, त्यांच्यावर नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयासह खाजगी रूग्णालयात उपचार सुरु आहेत.

उमरेड येथील ॲल्युमिनियम फॉइल बनवणाऱ्या कारखान्यात शुक्रवारच्या रात्री आग लागली. त्यानंतर येथे अनेक स्फोट झाले. यावेळी ७० ते ८० कामगार कामावर होते. मात्र, अनेकजण बाहेर पडले. रात्री उशिरापर्यंत आग विझवण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, गॅस उपलब्ध न झाल्याने आग विझवता आली नाही. दरम्यान, या घटनेत अनेक कामगार गंभीर जखमी झालेत. त्यातील, तिघांचा आज रूग्णालयात मृत्यू झाला. घटनास्थळी जेसीबीने उपसा केला असता आज दोघांचे कोळसा झालेले मृतदेह आढळून आले. मृतकांपैकी तिघांची ओळख पटली असून, डीएनए चाचणीद्वारे दोघांची ओळख पटवण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, आग आणि स्फोटाची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. ईटनकर, इतर प्रशासकीय व पोलीस अधिकारी तसेच खासदार श्याम बर्वे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी रात्री उशीरापर्यंत घटनास्थळी उपस्थित होते.

दरम्यान, या घटनेतील मृतकांच्या कुटुंबियांना ६० लाख जर जखमींना प्रत्येकी ३० लाख रूपयांची आर्थिक मदत कंपनीकडून देण्यात येणार आहे. पोलिस घटनास्थळी उपस्थित असून उमरेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धनाजी जलक अधिक तपास करत आहेत.

## ढिगाऱ्याखाली दबून ५ ठार

**विटांनी भरलेला ट्रक दुचाकीवर उलटला २ गंभीर**

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. १२ :** विटांनी भरलेला ट्रक दुचाकीवर कोसळून झालेल्या अपघातात ५ जण ठार, तर २ जण गंभीर जखमी झालेत. अकोला - मंगरुळपीर रोडवरील दगडपारवा गावाजवळ ही दुर्घटना घडली. मृतांत दुकाचीवरील एका व्यक्तीसह ट्रकमधील ४ जणांचा समावेश आहे.

विटांनी भरलेला ट्रक रस्त्याने जाणाऱ्या दुचाकीवर उलटला. या ट्रकवर ६ मजूर बसले होते. त्यांच्यासह दुचाकीस्वार या विटांच्या ढिगाऱ्याखाली दबला गेला. दबलेल्या लोकांना बाहेर काढेपर्यंत दुचाकीस्वारासह ट्रकमधील ४ जणांचा दबून मृत्यू झाला होता. जखमींची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.

## महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांची खैर नाही



**फडणवीस यांनी दिले कायदा करण्याचे संकेत**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांना कठोर शासन करण्याप्रकरणी एक कायदा करण्याचे संकेत दिले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना खरेतर टकमक टोकावरून लोटले पाहिजे. पण आपल्याकडे लोकशाही आहे. त्यामुळे या प्रकरणी निश्चित असे काही नियम तयार केले जातील, असे ते म्हणाले.

## सुप्रीम कोर्टाने ठरवली राष्ट्रपतींसाठीही डेडलाइन

**राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकांवर २ महिन्यांत निर्णय घ्यावा लागेल**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** आपल्या एका आगळ्यावेगळ्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने देशाच्या राष्ट्रपतींसाठीही कालमर्यादा निश्चित केली आहे. राज्यपालांनी पाठवलेल्या विधेयकावर राष्ट्रपतींना ३ महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा लागेल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकार आणि राज्यपालांच्या प्रकरणात एक ऐतिहासिक निर्णय दिला होता. विधानसभेने पाठवलेल्या विधेयकावर राज्यपालांना एका महिन्याच्या आत निर्णय घ्यावा लागेल, असे न्यायालयाने म्हटले होते. या निर्णयादरम्यान न्यायालयाने राज्यपालांनी राष्ट्रपतींना पाठवलेल्या विधेयकावरील भूमिकादेखील स्पष्ट केली. हा आदेश ११ एप्रिल रोजी सार्वजनिक करण्यात आला. शुक्रवारी रात्री वेबसाइटवर अपलोड केलेल्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या कलम २०१ चा हवाला दिला.

## समृद्धी महामार्गावर बाप-लेक ठार

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १२ :** समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातात देवदर्शन करून घरी परतणाऱ्या बापलेकाचा जागीच मृत्यू झाला.



रतन चंदनशिव आणि गोपाल रतन चंदनशिव अशी मृतांची नावे आहेत. रतन यांची पत्नी अर्चना चंदनशिव, मुलगी पूजा चंदनशिव, सून राणी गोपाल चंदनशिव आणि चालक शिवाजी इडोळे हे या अपघातात गंभीर जखमी झालेत. वाशीमचे चंदनशिव कुटुंब देवदर्शनासाठी बुलढाण्याला गेले होते. मेहकर तालुक्यातून जात असताना समृद्धी महामार्गावर त्यांच्या कारला भीषण अपघात झाला.

## फायलींसंदर्भात शहांशी चर्चा नाहीच..

■ **मुंबई, दि. १२ :** एकनाथ शिंदे यांनी काल रात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेत अर्थ खात्याबाबत नाराजी दर्शवल्याची माहिती होती. आमच्या फाईल्स अर्थखात्याकडून क्लिअर होत नाहीत, अशी तक्रार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहांकडे केली होती. परंतु, याबाबत अमित शहा मला काहीही बोलले नाहीत, शिंदे आणि माझे संबंध चांगले आहेत, असे पवार म्हणाले.



## लखनौची गुजरातवर ६ गडी राखून मात

■ **लखनौ, दि. १२ :** लखनौ सुपरजायंट्सने गुजरात टायटन्सचा ६ विकेट्सने पराभव केला. एकाना स्टेडियमवर झालेल्या सामन्यात गुजरातने ६ विकेट गमावून १८० धावा केल्या. लखनौने २० व्या षटकात केवळ ४ गडी गमावून लक्ष्य गाठले. निकोलस पूरनने ६१ आणि एडेन मार्करमने ५८ धावा केल्या. शार्दुल आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.



## ॲड. निलेश ओझा यांची पार्श्वभूमी गुन्हेगारीचीच
# उच्च न्यायालय कारवाईचे निर्देश देणार का?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** बहुचर्चित दिशा सालियान प्रकरणात वडील सतीश सालियान यांचो वकील ॲड. निलेश चंद्रभूषण ओझा याची पूर्वीपासूनची गुन्हेगारी पार्श्वभूमी लक्षात घेऊन उच्च न्यायालय कारवाईचे निर्देश देणार का? असा सवाल ॲड. चंद्रशेखर शिंदे (पुसद, जि.यवतमाळ) यांनी मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.



ॲड. चंद्रशेखर शिंदे यांचा पत्रकार परिषदेत सवाल

दिशा सालियानचा मृत्यू पाच वर्षांपूर्वी झाला. प्रकरण लोकांच्या विस्मरणात जाऊ लागले. त्यानंतर राष्ट्रीय मानवधिकार सुरक्षा परिषदेचे रशीदखान रहीमखान पठाण याने ठाकरे परिवारा विरूद्ध केलेल्या गंभीर आरोपामुळे दिशा मृत्यु प्रकरणाला गंभीर राजकीय वळण लागले. रशीदखान पठाणच्या तक्रारीवरून मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका आणि रिटपिटीशन दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयात ते प्रकरण सुरु आहे.

उच्च न्यायालयातील प्रत्येक तारखेनंतर दिशा सालियानचे वडील यांचा वकील ॲड. निलेश ओझा हे कामकाजाबद्दल नानाविध वक्तव्ये करीत आहे. काही वक्तव्य वादग्रस्त आणि राजकीय घराण्यासंबंधी तसेच न्यायाधिशांविषयी असल्याने प्रकरण अधीकच चर्चेत आले. न्यायाधिशांविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याची दखल घेवून उच्च न्यायालयाने ॲड. निलेश ओझा यांच्याविरुध्द अवमानना प्रकरण सुरु केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधिशांच्या खंडपिठापुढे हे अवमानना प्रकरण चालविण्यात येत आहे. या अवमानना प्रकरणात पुढे २९ एप्रिल २०२५ ही तारीख ठेवण्यात आली. या तारखेस ॲड. निलेश ओझा याला अवमानना प्रकरणात लेखी उत्तर दाखल करावयाचे आहे.

दरम्यान, ॲड. चंद्रशेखर शिंदे यांनी पत्रकार परिषदेत ॲड. निलेश ओझा याचा गुन्हेगारी इतिहास आणि पोलीस प्रशासनाची निष्क्रिय भूमिका याविषयी माहिती दिली. निलेश ओझा यांच्या गुन्हेगारी कृत्याविषयी बारकाऊंसील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा हे प्रामुख्याने २०१७ पासून बघ्याची भूमिका घेत आहे. बारकाऊंसीलच्या सर्व सदस्यांची ही भूमिका वकीली व्यवसायातील गुन्हेगारीला अप्रत्यक्ष प्रोत्साहन देणारे आहे, असा स्पष्ट आरोप ॲड. चंद्रशेखर शिंदे यांनी केला.

सर्वोच्च न्यायालयाने ॲड. विजय कुरले व अन्य यांच्या विरुध्द स्वतःहून सुरु केलेले फौजदारी अवमानना प्रकरण घडले नसते तसेच दिशा सालियान प्रकरणाबाबत ॲड. निलेश ओझा याने उच्च न्यायालयाचे न्यायाधिशांवर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे पुन्हा त्याचे विरुध्द अवमानना प्रकरण सुरु करण्याची वेळ आली नसती.

ॲड. निलेश ओझा यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन बडनेरा येथे अप. क्र. 261/2017 अंतर्गत भांदविचे कलम 420, 468 नुसार गुन्हा नोंद आहे. पुसद जिल्हा यवतमाळ न्यायालयातील फौजदारी प्रकरण 585/2013 प्रकरणात सुध्दा गंभीर स्वरुपाचे गुन्हे नोंद असून त्याच्यासह रशीदखान रहीमखान विरुध्द आरोप पत्र दाखल झाले आहे.

राजकीय पाठबळामुळे ॲड. निलेश ओझा यांच्याविरुध्द कार्रवाई होऊ शकली नाही असा आरोप करीत ॲड. निलेश ओझा याचा गुन्हेगारी इतिहास विचारात घेता त्याचे विरुध्द उच्च न्यायालय कारवाईचे आदेश देईल अशी अपेक्षा ॲड. चंद्रशेखर शिंदे यांनी व्यक्त केली.



## महाराष्ट्रातील शेतकरी हतबल

### जयंत पाटील यांची सरकारवर टीका



**मुंबई :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, कर्जबाजारीपणा, बोगस बियाणे आणि सरकारच्या असंवेदनशील धोरणांमुळे शेतकरी हतबल झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील शेतकरी हरिदास बोंबले यांनी कर्ज वसुलीच्या तगाद्याला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली, तर जालना जिल्ह्यातील एका शेतकऱ्याला गव्हाचे बोगस बियाणे निघाल्याने उभे पीक रोटावेटरने नष्ट करावे लागले.

या घटनांवरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर तीव्र टीका केली आहे. ह्यमहाराष्ट्रातील शेतकरी इतका हतबल कधीच नव्हता. ही काय परिस्थिती निर्माण केली आहे? असा संतप्त सवाल उपस्थित केला.

जयंत पाटील यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्यक्त केलेल्या मतात शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले, शेतीसाठी लागणारे साहित्य खरेदी करताना शेतकऱ्याला महागाईची झळ बसते. जीएसटीचा भुर्दंड सहन करावा लागतो. खतांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. सत्ताधारी कर्जमाफीची मोठमोठी आश्वासने देतात, पण ती फक्त शब्दांची वाफ आहे, हे शेतकऱ्यांनी ओळखले आहे. सततचा दुष्काळ, अवकाळी पाऊस यांसारख्या नैसर्गिक आपत्तींनी शेतकरी आधीच पिचला आहे, त्यात सरकारच्या असंवेदनशील धोरणांनी त्याला पूर्णपणे हतबल बनवले आहे. एकीकडे श्रीमंत धनदांडग्यांसाठी सरकार खैरात वाटत आहे, तर दुसरीकडे १-२ लाखांच्या कर्जामुळे शेतकरी कुटुंबे आपला आधार गमावत आहेत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. हरिदास बोंबले यांच्या कुटुंबाला तातडीने न्याय मिळावा, तसेच बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपनीवर फौजदारी खटला दाखल करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

## राज्यातील वातावरण खराब



**मुंबई :** बेरोजगार तरुणांच्या हाती हत्यार देत रामनवमी आणि हनुमान जयंतीच्या मिरवणुकीत पाठवले जात आहे, हा कसला धर्म आहे. आपला उत्सव आहे तो आपल्या मंदिरासमोर साजरा केला पाहिजे, चर्च, मशिदीसमोर जात वातावरण खराब करण्याचे काही कारण नाही, असे कोणत्याचे देवाने सांगितले नाही, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, हे जे नवे नवे हिंदुत्वाचे मुल्ला तयार झाले आहेत, त्यांनी वातावरण बिघडवण्याचे काम सुरू केले आहे. हनुमान जयंती, रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. पण मुंबईत ज्या मिरवणुकी निघाल्या त्या विकृती होत्या असे राऊतांनी म्हटले आहे. येणाऱ्या पिढ्या आम्हाला कशा प्रकारे लक्षात ठेवतील.

राम नवमी असो किंवा हनुमान जयंती, या आपल्या परंपरा आहेत. वर्षानुवर्षे आपण राम नवमी साजरी करत आहोत, हनुमान जयंती साजरी करत आहोत. हे सण आपल्या श्रद्धेचा भाग आहेत, आपल्या आत्म्याचा भाग आहेत. पण आता काही लोक ज्या पद्धतीने हे सण साजरे करण्याचा प्रयत्न करत आहेत - ते प्रत्यक्षात गोष्टींमध्ये व्यत्यय आणत आहे. हे आपल्या सनातन धमार्साठी, हिंदू धमार्साठी चांगले नसल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

## भीषण आगीत चार दुकाने खाक

**अंजनगाव सुर्जी :** तालुक्यातील पांढरी येथे चार दुकाने भीषण आगीत जळून खाक झाली. यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. अंजनगाव सुर्जी ते परतवाडा मार्गावरील पांढरी येथील स्टँडवरील काही दुकानांना अचानक आग लागली.

या आगीत अमोल हाडोळे यांचे श्री माऊली कृषी सेवा केंद्र, गजानन निंबोकार तसेच सुधाकर निंबोकार या दोघांचे सलूनची दुकाने व सुनील अतकरे यांचे पानटपरीसह चहा कॅन्टीन जळून खाक झाले आहे. माऊली कृषी सेवा केंद्राचे संचालक अमोल हाडोळे यांनी ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. या आगीमुळे रासायनिक खते, बियाणे व इतर साहित्य व त्याचप्रमाणे सलूनच्या दुकानातील साहित्य, चहाच्या दुकानातील साहित्य जळून खाक झाल्याचे नागरिकांनी सांगितले. घटनेची माहिती अंजनगावचे तहसीलदार पुष्पा सोळंके यांना मिळताच तत्काळ अग्निशामक गाडी पांढरी येथे पाठवण्यात आल्याने आग तातडीने आटोक्यात आणण्यात आली. या दुकानांमध्ये सिलिंडरही होते. परंतु, सिलिंडरला आग लागली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

## नीतेश राणेंही एकदिवस जेलमध्ये

**मुंबई :** माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे एक दिवसच जेलमध्ये राहिले होते. पण नीतेश राणे यांचा तुरुंगातील मुक्का फार लांब असू शकतो, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. दरम्यान, बघू, तुरुंगात ते जातात की मी, असे म्हणत नीतेश राणे यांनी दानवे यांना आव्हान दिले आहे.

नीतेश राणे यांनी गुरुवारी सायंकाळी सिंधुदुर्गात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना महाविकास आघाडीच्या काळात नारायण राणेंना झालेल्या अटकेवर भाष्य केले होते. नीतेश राणे यांच्या या विधानाविषयी ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांना छेडले असता त्यांनी नीतेश राणे यांनाही नारायण राणेंसारखे एकदिवस तुरुंगात जावे लागेल, त्याची चिंता करू नका, असे दानवे यांनी स्पष्ट केले.

# वेतन कपातीमुळे कर्मचाऱ्यांत संताप

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १२ :**



विभागीय कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांची निदर्शने

गेल्या काही दिवसापासुन आर्थीक मंदीची झळ सहन करत असलेल्या राज्य परिवहन महामंडळाने मार्च महिन्याच्या पगारात तब्बल ४४ टक्के कपात करुन केवळ ५६ टक्के पगार कर्मचाऱ्यांच्या हाती टिकवला आहे.

यामुळे एसटीच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली असून शासनाच्या या निर्णयाविरुद्ध एसटी कर्मचाऱ्यांनी एकत्र येत विभागीय कार्यालयाच्या समोर आंदोलन केले. यावेळी नारेबाजी करीत निषेध नोंदवण्यात आला.

राज्य परिवहन महामंडळातील कामगारांनी कोरोना काळानंतर वेतनाकरिता संप पुकारला होता. बराच काळ चाललेल्या या संपानंतर न्यायालयाने कर्मचाऱ्यांचे वेतन महिन्याच्या ७ किंवा १० तारखेपर्यंत काढावे, असे आदेश दिले होते. असे असताना परिवहन महामंडळाच्या वतीने बऱ्याचदा वेतनासाठी विलंब करण्यात येतो. आता तर मार्च महिन्याचे कर्मचाऱ्यांचे वेतन देताना त्यामध्ये तब्बल ४४ टक्के वेतनाची कपात करुन केवळ ५६ टक्के पगार कर्मचाऱ्यांना दिला आहे.

यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये परिवहन विभागाच्या विरोधात नाराजीचा सूर उमटला आहे. अत्यल्प मनुष्यबळातील कर्मचारी काम करीत आहे. परंतु अर्धा पगार देण्याची नामुष्की परिवहन विभागाने केली. एसटीच्या आर्थिक परिस्थितीबाबत कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी आणि उपदानाच्या तरतुदीस अनुसरून वेतनातून वसुली करण्यात आली होती. मूल्याचा परतावा हवा प्रवासी भाडेवाढ आणि विविध सवलतीमुळे राज्यातील जनतेला आवश्यक प्रवासी सेवा देण्यात मनुष्यबळ आणि वाहन संख्यांची कमतरता जाणवत आहे. सवलत मूल्याचा परतावा विहित कालमर्यादेत होत नाही. याची शिक्षा कर्मचारी भोगत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी निवेदनातून केला आहे. हे आंदोलन महाराष्ट्र एसटी कामगार सेनेच्या वतीने करण्यात आले.

तिकडे, अकोला येथेही एसटी कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेच्या वतीने नवीन बस स्थानक परिसरात आंदोलन करण्यात आले. कामगारांना मागिल महिन्याचे संपूर्ण वेतन देण्याची आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

## गळती रोखण्यासाठी ठाकरे मातोश्रीतून बाहेर पडणार

### १६ एप्रिलपासून सभांचा धडाका

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ :**



उद्धवसेनेत सध्या मोठ्या प्रमाणावर गळती सुरू आहे. अनेक स्थानिक पातळीवरील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि काही नेते शिंदेसेनेत प्रवेश करत असल्याने पक्षासाठी मोठी डोकेदुखी बनली आहे. ही गळती रोखण्यासाठी उद्धव ठाकरे आता राज्यव्यापी दौरा करणार आहेत. आगामी महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा दौरा महत्वाचा मानला जात आहे.

या दौऱ्याची सुरूवात १६ एप्रिलला नाशिक येथून होणार असून, त्यानंतर कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही जाहीर सभा व कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचे ठाकरे यांचे नियोजन आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राज्यातील सभा आणि जाहीर कार्यक्रमांना सध्या चांगला प्रतिसाद मिळत आहेत.

यामुळे उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीच्या चौकटीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. विधानसभेला उद्धवसेनेला जबर फटका बसला. त्यानंतर दर आठवड्याला किमान चार ते पाच महत्त्वाचे कार्यकर्ते, पदाधिकारी शिंदेसेनेत जात आहेत. त्यांना रोखण्याचे आव्हान उद्धवांपुढे आहे.

काँग्रेसची साथ स्वीकारल्याने उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडले, असा आरोप केला जात आहे. तो पुसण्याचा प्रयत्न ते राज्यव्यापी दौऱ्यातून करणार आहेत. नाशिक हे हिंदुबहुल आणि धार्मिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर आहे. म्हणून तेथून उद्धव ठाकरे राज्यव्यापी दौऱ्याला सुरूवात करणार असल्याचे म्हटले जात आहे. उद्धवसेनेतील सूत्रांनी सांगितले की, इतर राज्यातील इतर प्रमुख शहरांच्या तुलनेत नाशिक शहरामध्ये उद्धवसेनेची संघटना मजबूत असल्याचा अहवाल उद्धव यांना नुकताच सादर करण्यात आला आहे. शिंदेसेना नाशिकमध्ये पाय रोवण्याच्या आधीच हल्लाबोल करण्याचा सल्लाही उद्धव यांना देण्यात आला आहे.

## टँकर संपावर तोडगा काढा

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**



मुंबई वॉटर टँकर असोसिएशनच्या संपामुळे शहरातील काही भागांत पाणीटंचाई निर्माण झाली आहे. ऐन उन्हाळ्यात ही समस्या गंभीर बनत असल्याने सामान्य नागरिकांचा त्रास टाळण्यासाठी तातडीने तोडगा काढावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्तांना दिले आहेत.

टँकरचालकांच्या मागण्या आणि नवीन नियम यांच्यात सुवर्णमध्य साधत ही परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे आदेश त्यांनी दिले.

मुंबईत सध्या जलाशयांमध्ये केवळ ३३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर काही भागांत पाणीकपात सुरू आहे, आणि नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत टँकरचालकांनी नवीन नियमांच्या विरोधात पुकारलेल्या संपामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. या संपाचा फटका झोपडपट्ट्या, मॉल्स, हॉटेल्स, रुग्णालये, मेट्रो आणि इमारत बांधकामांना बसत आहे. विशेषतः गैरपेयजलाची गरज असलेल्या प्रकल्पांना याचा मोठा त्रास होत आहे.

मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या नव्या नियमांना विरोध दर्शवत १० एप्रिलपासून बेमुदत संप सुरू केला आहे. या नियमांमध्ये प्रत्येक विहिरीभोवती २०० चौरस मीटर जागेची अट, फ्लो मीटर आणि जीपीएस ट्रॅकिंग यंत्रणा बसवण्याची सक्ती यांचा समावेश आहे. टँकरचालकांचे म्हणणे आहे की, मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरात या अटींचे पालन करणे अव्यवहार्य आहे. यामुळे त्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या समस्येची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी मुंबई महापालिका आयुक्तांना टँकरचालकांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या आणि नियमांमधील त्रुटींवर तोडगा काढण्याचे निर्देश दिले. उन्हाळ्याच्या काळात पाणीटंचाईमुळे नागरिकांचा त्रास वाढता कामा नये. टँकरचालकांच्या मागण्यांचा विचार करत सामान्य जनतेला त्रास होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी २०२३ मध्येही टँकरचालकांनी असाच संप पुकारला होता, तेव्हा फडणवीस यांनी मध्यस्थी करून तो सोडवला होता. यंदाही त्यांनी तातडीने हस्तक्षेप करत महापालिकेला त्वरित पावले उचलण्यास सांगितले आहे. यामुळे लवकरच टँकरचालकांशी चर्चा होऊन हा संप मिटण्याची शक्यता आहे. तरीही, पाणीटंचाई आणि संपामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.

## कृषिमंत्र्यांच्या घरासमोर प्रहारचे आंदोलन

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. १२ :** राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करत सातबारा कोरा करावा, या मागणीसाठी प्रहार संघटनेच्यावतीने राज्याचे कृषीमंत्री अ‍ॅड. माणिकराव कोकाटे यांच्या निवासस्थानासमोर शुक्रवारी रात्री तासभर मशाल आंदोलन करण्यात आले.

यावेळी पोलिसांना कृषीमंत्री कुठे हे माहिती नाही, महाराष्ट्रात असे कधी होत नाही, मिसिंग मंत्री झाले आहेत, असा टोला बच्चू कडू यांनी लगावला आहे. कडू म्हणाले की, आमचे आंदोलन थांबले असताना पोलिसांकडून चक्का जाम करण्यात येत आहे. हा गुन्हा पोलिसांवर दाखल झाला पाहिजे. आम्ही पुढे जाऊ नये म्हणून पोलिसांनी दोन ट्रक लावत महामार्ग अडवला.

निवडणूक काळात महायुतीच्या प्रमुख नेत्यांनी कर्जमाफीचे आश्वासने दिले होते. सत्ता मिळाल्यानंतर संबंधितांना त्याचा विसर पडला. शेतकऱ्याला कर्जमाफीची आवश्यकता असल्याकडे लक्ष वेधण्यात आले. आम्ही कोकाटे यांना भेटायला जात असताना पोलिसांनी आम्हाला अडवण्याची भूमिका का घेतली माहिती नसल्याचे कडू म्हणाले.

# दीनानाथ रुग्णालयाने आमटेंकडूनही ५ लाख घेतले

### विजय वडेट्टीवारांची पुन्हा मंगेशकरांवर टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**



काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने प्रकाश आमटेंकडून ५ लाख रुपयांचे बिल घेतले होते. एवढेच नाही तर हे रुग्णालय धमार्दाय पद्धतीचे असूनही त्यातील ७ वा मजला हा पूर्णतः मंगेशकर कुटुंबीयांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. धर्मादाय रुग्णालय असूनही येथे तपासणीसाठी २० रुपयांऐवजी ६०० रुपये घेतले जातात, असे ते म्हणालेत.

विजय वडेट्टीवार शनिवारी पत्रकारांशी बोलताना मंगेशकर कुटुंबीयांचे वेगवेगळे किस्से सांगितले. ते म्हणाले, हे दीनानाथ हॉस्पिटल सत्ताधारी आमदारांच्या पीएकडून १० लाख रुपये घेतल्याशिवाय उपचार करू शकत नाही, तर गरिबांची सेवा करणारे रुग्णालय आहे का? हे चॅरिटी हॉस्पिटल आहे का? याचाही विचार विविध क्षेत्रातील मान्यवरांनी करावा. उगीच भावनेच्या भरात काहीतरी वाचवण्याचा व सपोर्ट करण्याचा प्रयत्न करू नये अशी माझी त्यांना कळकळीची विनंती आहे. मी कुणावरही टीका करत नाही. मी केवळ वस्तुस्थिती मांडत आहे, असे वडेट्टीवार म्हणाले.

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले, प्रकाश आमटे यांना कॅन्सर डिटेक्ट झाला त्यावेळी एका मध्यस्थीने दीनानाथ रुग्णालयाच्या प्रशासनाला उपचारासंबंधी विचारणा केली. त्यावेळी त्यांनी आमटे यांना अ‍ॅडमिट होण्याचा सल्ला दिला. त्यांनी आम्ही प्रकाश आमटेंकडून एकही रुपया घेणार नाही, त्यांच्यावर मोफत उपचार करू अशी ग्वाहीही दिली. पण नंतर बाहेरून औषधी मागवण्याचे कारण सांगत आमटे यांच्या आप्तेष्टांकडून ५ लाख रुपये वसूल केले.

ते पुढे म्हणाले, परभणीला एक साहित्य संमेलन होते. नारायण सुर्वे त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. या कार्यक्रमात आशाताई भोसले यांच्या गायनाचा कार्यक्रम ठरवण्यात आला होता. तेथील तत्कालीन खासदारांचे नाव मला आठवत नाही. पण ते आशादीदींकडे गेले. त्यांनी त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. पण त्यांनी त्यांच्याकडे २ लाख रुपये देण्याची मागणी केली. नंतर कार्यक्रम जवळ आल्यानंतर त्यांनी पुन्हा ३ लाख रुपयांची मागणी केली. आयोजकांनी त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. पण त्या बधल्या नाहीत. पैसे मिळाल्याशिवाय मी येणार नाही असे त्या म्हणाल्या.

वडेट्टीवार यांनी यावेळी आणखी एका कार्यक्रमाचाही किस्सा सांगितला. ते म्हणाले, नागपूर कॉर्पोरेशनचा एक कार्यक्रम होता. त्यावेळी लतादीदींनी विदर्भ साहित्य संमेलनाच्या मंचावर मोफत गाण्याची तयारी दर्शवली होती. त्यामुळे आयोजकांनी कार्यक्रमाची तारीख ठरवून त्यांच्याशी संपर्क साधला. तिकडून निरोप आला की, आमची सोय पंचतारांकित हॉटेलमध्ये करा. आमच्या वाद्य संचाला तुम्हाला पैसे द्यावे लागतील. एवढेच नाही तर आमच्यासाठी विशेष विमानाचीही सोय करावी लागेल. त्यावर आयोजकांनी यासाठी किती खर्च येईल अशी विचारणा केली. त्यावर त्यांना २२ लाख लागतील असे सांगण्यात आले.

त्यांनी या रकमेचा चेक देण्याचा प्रयत्न केला. पण त्यावेळी हृदयनाथ मंगेशकर यांनी हे पैसे चेकने नव्हे तर कॅशमध्ये मागितले, अशी आठवण वडेट्टीवार यांनी सांगितली.

## मोरेश्वरासह पाच गणपती मंदिरांत ड्रेसकोड

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :** अष्टविनायकापैकी मोरेगावचा मोरेश्वर, थेऊरचा चिंतामणी व सिद्धटेकच्या सिद्धिविनायकासह इतर 2 गणपती मंदिरांसाठी चिंचवड देवस्थान ट्रस्टने वस्त्रसंहिता जारी केली आहे.

या संहितेनुसार, या गणपतींच्या दर्शनासाठी येणाऱ्या पुरुष भाविकांना सभ्य पोशाख परिधान करावा लागणार आहे. तर महिलांनाही पारंपरिक पोशाख किंवा मंदिराच्या पावित्र्यास अनुकूल असणारे आदरयुक्त वस्त्र परिधान करावे लागणार आहेत.

चिंचवड देवस्थान ट्रस्टकडे मोरेगावचा मोरेश्वर, थेऊरचा चिंतामणी व सिद्धटेकच्या सिद्धिविनायक या अष्टविनायकापैकी 3 मंदिरांसह चिंचवडचा मोरया गोसावी संजीवन मंदिर व खार नारंगी मंदिराचे नियंत्रण आहे. त्यानुसार, या ट्रस्टने या पाचही गणपती मंदिरांसाठी वस्त्रसंहिता लागू केली आहे. ट्रस्टने ही नियमावली म्हणजे सक्ती नसून, मंदिराचे पावित्र्य राखण्याचे आवाहन केले आहे.

## १० हजाराची सुपारी देत दोघांचा खून

### जावई, मामा आणि भावाने रचला कट

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १२ :**

मेव्हण्याने विवाहीत महिलेशी लग्न केल्यास आपली समाजात बदनामी होईल म्हणून जावई, मामा आणि भावाने कट रचून जावयाने दोन मित्रांच्या मदतीने मेव्हण्यासह त्या विवाहीत महिलेची हत्या केल्याची कबुली पोलिसांसमोर दिली.

ही घटना दिग्रस तालुक्यातील ईसापूर शेत शिवारातील दत्तापूर गावाजवळील कोलुरा ते फेट्री मार्गावर ७ एप्रिलला उघडकीस आली होती. या प्रकरणातील चौघांना दिग्रस पोलिसांसह एलसीबी पथकाने ताब्यात घेतले आहे. याबाबतची माहिती पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिली.

वर्षा धनराज गिरे (वय २६) वर्ष रा. उमरी बु. जि. वाशीम आणि आकाश विलास बल्लाळ (वय २५) वर्ष रा. गोस्ता रूई जि. वाशीम अशी मृतकांची नावे आहेत. तर विजय भारत शिकारे (वय २९) वर्ष, राजेश सोनबा गोदमले (वय ३४) वर्ष, धर्मराज तुकाराम बोडके (वय ३०) वर्ष सर्व रा. विठाळा ता. दिग्रस, विकास विलास बल्लाळ (वय २१) वर्ष रा. गोस्ता रूई जि. वाशीम अशी ताब्यात घेण्यात आलेल्या चौघांची नावे असून विशाल शिकारे हा अद्याप फरार असून त्याच्या शोधात पथके रवाना करण्यात आली आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक पियुष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी रजनीकांत चिलुमुला, सतिश चवरे, सेवानंद वानखडे यांच्यासह एलसीबीतील अधिकारी यांनी पार पाडली.

आरोपींनी जवळच्या दोन मित्रांना खूनाची सुपारी देण्याबरोबरच दारुसाठी पैसेही पाठवले . घटनास्थळावर दोन्ही मित्रांना बोलावून त्यांच्या मदतीने प्रथम आकाश याच्यावर हल्ला चढवून त्याची हत्या केली. त्या ठिकाणाहून पळ काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या वर्षा हीचा पाठलाग करीत तिचीही हत्या करण्यात आली. त्यानंतर हत्येचा मोबदला म्हणून राजेश गोदमले आणि धर्मराज बोडखे या दोघांना पाच हजार रुपये ऑनलाईन आणि पाच हजार रुपये रोख असे दहा हजार रुपए जावई विजय याने दिले होते.

दिग्रस तालुक्यातील फेटरी, साकरी वनविभागाच्या जंगल परिसरात ७ एप्रिलला अनोळखी तरूणासह महिलेचा मृतदेह आढळून आला होता. शवविच्छेदनानंतर त्या दोघांची हत्या झाल्याची बाब समोर आली. मात्र ते दोघे कुठले रहिवासी आहेत, याबाबत कोणालाही काही माहिती मिळत नव्हती.

मृतदेहाच्या वर्णनावरून मृतकांचे स्केच तयार करण्यात आले. त्याचबरोबर आजूबाजूच्या जिल्ह्यातील मिसींग महिला, पुरूषांचा शोध सुरू करण्यात आला. तसेच शोधपत्रिका प्रसारित करण्यात आली. अशात वाशीम जिल्ह्यातील उमरी येथील वर्षा गिरे ही महिला बेपत्ता असल्याचे निष्पन्न झाल्याने या प्रकरणाचा क्ल्यू पोलिसांना मिळाला.

तिचे संबंध असलेल्या व्यक्तीचाही शोध घेत असताना सदर ईसम बेपत्ता असल्याचे लक्षात आले . त्यातून, जवळच्या नातेवाईकांना ताब्यात घेवून विचारपूस करण्यात आली आणि दुहेरी हत्येचे रहस्य उलगडण्यात पोलिसांना यश आले.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येणार?

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ :**



राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार आणि अजित पवार यांच्या गटांमध्ये २०२३ मध्ये फूट पडली असली, तरी दोन्ही गटांच्या एकत्र येण्याच्या चर्चांनी सध्या राजकीय वर्तुळात जोर धरला आहे.

दोन्ही गट एकाच विचारधारेवर चालत असल्याचे दिसते. शरद पवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने नेहमीच मानवतावादाला प्राधान्य देत, जातीपातीच्या पलीकडे जाऊन ऐक्याचा संदेश दिला. हाच विचार अजित पवार यांचा गटही पुढे नेत आहे. मग विचार आणि ध्येय एकच असताना हे दोन्ही गट किती काळ वेगळे राहू शकतात, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना करताना शरद पवार यांनी जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवले. सामाजिक न्याय, शेतकरी आणि सर्वसामान्यांचे हित यांना प्राधान्य देणारी ही विचारधारा आजही दोन्ही गटांमध्ये दिसून येते. अजित पवार यांचा गट सत्तेत असला, तरी शरद पवार यांच्या गटानेही आपली सामाजिक बांधिलकी आणि जनतेच्या प्रश्नांवरील लढा कायम ठेवला आहे. राष्ट्रवादीचा झेंडा सत्तेत असो वा नसो, तो नेहमी फडकत राहिला आहे.

सत्तेशिवाय पक्ष टिकवणे आणि कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावणे कठीण असते, असे राजकीय वास्तव आहे. आगामी सहा वर्षे विधानसभा आणि लोकसभा निवडणुका नाहीत. अशा परिस्थितीत शरद पवार यांच्या गटातील कार्यकर्त्यांना एकत्र ठेवण्याचे आव्हान पक्षश्रेष्ठींसमोर आहे. दुसरीकडे, अजित पवार यांचा गट सत्तेत असल्याने त्यांना कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे तुलनेने सोपे आहे. यामुळे दोन्ही गटांमध्ये एकत्र येण्याच्या शक्यतांवर विचार होत असल्याची चर्चा आहे.

राष्ट्रवादीच्या फुटीमुळे पक्षातच नव्हे, तर पवार कुटुंबातही दरी निर्माण झाल्याची चर्चा होती. मात्र, कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये शरद पवार आणि अजित पवार यांचे कुटुंब एकत्र दिसते. अजित पवार यांनी अनेकदा जाहीरपणे शरद पवार यांना आपले दैवत संबोधले आहे. शरद पवार यांच्या गटाविरोधात कोणतीही आक्रमक भूमिका घेण्यास अजित पवार गट धजावत नाही. याउलट, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्यातील वैयक्तिक टीका काही प्रसंगी दिसून येते, पण शरद पवार यांच्याविषयी दोघेही सावध भूमिका घेतात.

**अंतर्गत नाराजी आणि शांतता**

शरद पवार गटातील जयंत पाटील आणि रोहित पवार यांच्या नाराजीच्या चर्चा अधूनमधून समोर येतात. मात्र, इतर मुद्द्यांवर दोन्ही गटांमध्ये शांतता आहे. एकमेकांवर लक्ष ठेवण्याऐवजी प्रत्येकजण आपापल्या मार्गाने पुढे जात आहे. दोन्ही गटांमध्ये विचारधारा आणि ध्येय एकच आहे. मग फूट किती काळ टिकेल? असा सवाल राजकीय विश्लेषक उपस्थित करतात.

**एकत्र येण्याची शक्यता?**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात आक्रमकता कमी केल्याचे दिसते. शरद पवार यांच्या हयातीत पक्षाला पुन्हा एकत्र आणण्याचा विचार होऊ शकतो, असे काही जाणकारांचे मत आहे.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट सत्तेत आहे, तर शरद पवार यांचा गट विरोधी पक्षात प्रभावी भूमिका बजावत आहे. दोन्ही गटांच्या नेत्यांमध्ये संवादाची काही पातळी कायम आहे.

## बाभळीच्या काट्यांमध्ये सापडला मृतदेह

■ **वृत्तसंस्था, हिंगोली, दि. १२ :** आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत बोल्डाफाटा शिवारात बाभळीच्या काट्यांमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह शनिवारी आढळून आला. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले

आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत बोल्डा फाटा शिवारात असलेल्या एका प्रवासी निवाऱ्यासमोर मागील काही दिवसांपासून बाभळीचे झाड पडले आहे. त्यानंतर आज सकाळी या बाभळीच्या झाडाच्या काट्यांमध्ये एक मृतदेह असल्याची बाब त्या भागातून वाहतूक करणा?या नागरीकांना दिसली होती. त्यांनी पाहणी केली असता सदर व्यक्तीचा मृतदेह काट्यांच्या मध्ये असल्यामुळे त्याला ओळखणे कठीण झाले होते.

या घटनेची माहिती मिळताच आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, उपनिरीक्षक गणेश घोटके, जमादार पंढरी चव्हाण, परमेश्वर सरकटे, प्रविण चव्हाण यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी त्या ठिकाणी पाहणी केली असता मृतदेह बाभळीच्या काट्यांमध्ये अडकलेला दिसून आला. याप्रकरणी तपास सुरू करण्यात आला आहे.



# विटांनी घर नाही संसार उध्वस्त १ ठार ७ गंभीर जखमी

■बार्शिटाकळी,दि १२ (प्रतिनिधी)



येथून तीन किलोमीटर अंतरावर रेडवा फाटा टी पॉईट जवळ जिप्सी आणि दुचाकी मध्ये झालेल्या अपघातात एक जण ठार झाला. शनिवारी सकाळी दहा वाजताच्या सुमारास घडली.

प्राप्त माहिती नुसार जिप्सी विटा घेऊन जात असताना समोरून मंगरूळपी रोडने आणि रेडवावरून एक दुचाकी असा तिहेरी अपघात झाला. समोरासमोर धडक झाल्याने घटना घडली. अपघातात एक व्यक्ती घटनास्थळी मरण पावली. एका महिलेच्या पायाला गंभीर दुखापत झाली. तर पाच जण गंभीर जखमी झाले. अपघातग्रस्त वाहन विटा घेऊन छोटा बाजार येथून मंगरूळपी रोडच्या साईडला जात असताना हा अपघात झाल्याचे समजते. अपघात इतका भयानक होता की जिप्सी गाडी आंब्याच्या झाडावर आदळली. जिप्सी गाडीचे दोन तुकडे झाले. दोन्ही दुचाकी चपकल्या.गंभीर जखमींना अकोला सवीपचार रुग्णालयात पाठविण्यात आले. तर मृतदेह पोस्टमार्टम करिता अकोल्याला पाठविण्यात आला आहे. तपास बाशीटाकळीचे ठाणेदार तुलकनवार यांच्या मार्गदर्शनात करण्यात येत आहे. रस्त्यावर अपघात झाल्यामुळे बघ्यांची मोठ्या संख्येने गर्दी झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहचुन गर्दी नियंत्रित केली.

# मशालीतून उठली आग–शेतकरी दिव्यांगांच्या हक्कांसाठी प्रहारचा एल्गार!

## कडेकोट पोलीस बंदोबस्तात मशाल मोर्चा शासनाला इशारा



■मुर्तिजापुर,दि १२ (प्रतिनिधी)



'दररोज सात शेतकरी आत्महत्या करतात आणि सत्ताधाऱ्यांच्या डोळ्याला अजून झापडं लागली आहेत! निवडणुकीआधी 'शेतकऱ्यांचे पुत्र' म्हणून मिरवणारे आज गप्प का?' असा थेट सवाल करत प्रहार जनशक्ती पक्षाने शासनाला जोरदार इशारा दिला आहे.

११ एप्रिलच्या रात्री साडेअकरा वाजता, पेटट्या मशाली हातात घेऊन आक्रमक नारे देत प्रहार आंदोलनकर्ते मुतीजापुर–बाशीटाकळी या संयुक्त मतदारसंघाचे आमदार हरीश मारुती 'अप्पा' पिंपळे यांच्या मुतीजापुर येथील जनसंपर्क कार्यालयावर आले. शेतकऱ्यांच्या आणि दिव्यांग बांधवांच्या न्यायहक्कांसाठी त्यांनी निवेदन देत सरकारविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली. तालुका अध्यक्ष अक्षय अनिल वैराळे यांच्या नेतृत्वात देण्यात आलेल्या निवेदनात शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी त्वरित व्हावी, पेरणी ते कापणीपर्यंतचा खर्च मनरेगामधून द्यावा आणि दिव्यांग बांधवांना दरम हा ६००० रुपये मानधन मिळावे. अशा ठाम मागण्या करण्यात आल्या आहेत. या आंदोलनासाठी शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश सूर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक आशिष शिंदे, पोलीस उपनिरीक्षक पवार साहेब यांच्या नेतृत्वात मुतीजापुर पोलिसांचा कडेकोट व चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. 'हातात निळा दुपट्टा, तोंडात छत्रपतींचं नाव आणि मनात सत्तेची हाव्रहे चालणार नाही! सरकार जर बधत नसेल, तर प्रहारच्या मशालीचा उजेड थेट विधानसभेत पोहोचेल!' असा आक्रमक इशारा प्रहारने दिला. महात्मा फुले जयंती (११ एप्रिल) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल) या पार्श्वभूमीवर ही चळवळ अधिक तीव्र होणार असल्याचं स्पष्ट करत प्रहारने सांगितलं की, 'ही लढाई शेतकऱ्याच्या जिवाची आणि दिव्यांगाच्या हक्काची आहे',आणि या लढाईत प्रहार एकही पाऊल मागे जाणार नाही!यावेळी प्रहार संघटनेचे अक्षयभाऊ वैराळे प्रहार तालुका प्रमुख,नारायणभाऊ लोखंडे उप तालुका प्रमुख,संदिप भाऊ चव्हात युवक तालुकाध्यक्ष, प्रल्हाद भाऊ मालळकर, पुडलिंग धंदरे, तुषार लोखंडे, रामेश्वर खुळे,पंकज भाऊ आंधळे, विठ्ठल भाऊ घुगे, रणजीत लोखंडे आधी आंदोलनकर्ते उपस्थित होते.

# ऑटो चालकानी ऑटो चालवितांना गनवेश परीधान करावा : पोलीस अधीक्षक

■अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :



जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्री. बच्चन सिंग साहेब यांचे संकल्पनेतुन व त्यांचे मार्गदर्शनात शहर वाहतुक नियंत्रण शाखा, अकोला तर्फे सर्व ऑटो चालक, ऑटो रिक्षा संघटना आणि प्रवाश्यांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, ऑटो चालक व ईतर प्रवासी वाहन चालक यांनी आपले प्रवासी वाहन चालवितांना गणवेश परिधान करावे. शहरातील सार्वजनीक वाहतुकीस शिस्तबध्द व सुरक्षित बनविण्याच्या उद्देशाने सर्व ऑटो चालकांनी सेवा देतांना अधिकृत गणवेश परिधान करणे बंधनकारक असुन मोटार वाहन कायदा कलम २० (१) (Viii) / १७७ प्रमाणे आवश्यक आहे. गणवेश परिधान केल्याने प्रवाशांना विश्वासार्हता मिळते. तसेच शिस्त आणि स्वच्छतेला प्रोत्साहन मिळते. सर्व ऑटोचालकांनी व प्रवासी वाहतुक करणारे वाहन चालकांनी याबाबत सहकार्य करावे अन्यथा दिनांक १४/०४/२०२५ रोजी पासुन संपुर्ण अकोला जिल्हयात प्रवासी वाहन चालविणारे चलकांनी गणवेश परिधान न केल्यास दंडात्मक कारवाई करण्याची मोहीम सुरू करण्यात येणार आहे तरी सर्व ऑटो चालक व इतर प्रवासी वाहन चालक यांनी याबाबत दक्षता घ्यावी. ऑटो चालकांनी वाहतुक नियमांचे पालन करावे.

व सोबत वाहनांचे कागदपत्रे बाळगावे व आपले वाहनावर पेंडीग दंड असल्यास त्वरीत वाहतुक पोलीस किंवा शहर वाहतुक कार्यालय येथे दंड भरावा, असे आवाहन मा. श्री. बच्चन सिंग साहेब पोलीस अधीक्षक अकोला यांनी अकोल जिल्हयातील नागरीकांना केले आहे.

# महिलेस शिविगाळ, धमकी, गुन्हा दाखल

बाळापूर : शेजारी राहणाऱ्यांमध्ये क्षुल्लक कारणावरून वाद होवून विट फेकून मारल्यामुळे महिला जखमी झाल्याप्रकरणी दाखल फिर्यादनुसार बाळापूर पोलिसांनी तामशी येथील एकाविरूध्द गुन्हा नोंदविला.

या संदर्भात दिलेल्या फिर्यादनुसार शंकर माणिक पातोडे याला 'तु काय पाहत आहेस' असे महिलेने विचारले असता शंकर पातोडे यांनी महिलेस विट फेकून मारली. तसेच फियादीस मारण्याची धमकी दिली.

# हनुमान जयंती उत्साहात साजरी



■अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :

शनिवारी हनुमान जयंती साजरी करण्यात आली. शहरातील विविध भागातील हनुमान मंदिरे आणि निवासस्थानी पहाटे हनुमान जन्मोत्सव हर्षोल्हासात साजरा झाला. मंदिरावर रोषणाई करण्यात आलीआहे. सजावट केलेली दिसते. तसेच भंडा–याचे देखील आयोजन करण्यात आले होते. या निमित्त सुंदरकांड, मारोती स्तोत्र पठण करण्यात आले. काळा मारोती, तपे हनुमान, राजराजेश्वर जवळील मंदिर, हिंगणा मारोती, पंचमुखी हनुमान संकटमोचन हनुमान मंदिरमंदिर,तसेच शहरातील विविध भागात असणाऱ्या हनुमान मंदिरात शनिवारी पहाटे हनुमान जयंती साजरी करण्यात आली. शुक्रवारपासून तयारी सुरू होती. हनुमान मंदिरा लगत नारळ, फुले, प्रसादाची दुकाने थाटलेली होती. भाविकांनी संकटमोचकाचे मनोभावे दर्शन घेतले.

# वयोवृद्ध इसमाची बॅग हिसकावुन पळणाऱ्या आरोपींना केली अटक

■अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :



पो.स्टे.सिटी कोतवाली, अकोला येथे फिर्यादी नामे ठाकुरदास इसरदास नागवानी, वय ७३ वर्षे रा. सिंधी कॅम्प, अकोला यांनी रिपोर्ट दिला की, दि. १०/०४/२०२५ रोजी रात्री ०९/१५ वा दरम्यान फिर्यादी हे त्यांचे मोटार सायकलने इंटक ऑफीस समोर, खोलेश्वर, अकोला येथुन जात असतांना दोन अनोळखी इसमांनी मोटार सायकलने फिर्यादीचे विरूध्द दिशेने येवुन फिर्यादीला अडविले व फियादीचे जवळ असलेली काळया रंगाची बॅग ज्यामध्ये नगदी १३,५००रु, १०० अमेरीकन डॉलर चे ०८ नोटा व इतर कागदपत्र असे होते ती बॅग बळजबरीने हिसकावुन नेले वरून फिर्यादीने आरडाओरड केली असता दोन्ही अनोळखी इसम हे त्यांचे मोटार सायकलने घटनास्थळावरून पळुन गेले अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून अप क्रं ८९/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करून तपासात घेतला. सदर गुन्हयाचे तपासात गुप्तबातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरून पो.स्टे. सिटी कोतवाली येथील डि.बी. पथकाने सदर गुन्हयात आरोपी नामे १) मनोज कालीचरण लुडेरे, वय २० वर्षे रा. बापुनगर, अकोट फाईल, अकोला २) रोहीत साहेबराव इंगोले, वय १९ वर्षे रा. मलकापुर, अकोला ३) अंश मनीष पटेकर, वय २० वर्षे रा. बंजारा कॉलनी, बलोदे लेआउट, अकोला यांना निष्पन्न करून आरोपीतांकडुन गुन्हयात चोरी गेलेले नगदी १३,५००रु, १०० अमेरीकन डॉलर च्या ०८ नोटा भारतीय किंमती नुसार कि.अं. ७०,०००रू व गुन्हयात वापरलेल्या दोन मोटार सायकली कि.अं. १,००,००० असा एकुण १,८३,५०० रू चा मुद्देमाल हस्तगत करून २४ तपासाच्या आत सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

# संकट असो कितीही बलवान.. रक्षा करतो सर्वांची वारीचा हनुमान

■हिवरखेड,दि १२ (प्रतिनिधी)

समर्थ रामदास स्वामींनी साकारलेले वारी येथील हनुमानजी हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून वारी हनुमान हे लोकप्रिय तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास येत आहे.मध्य प्रदेशच्या सीमेपासून जवळच असलेले आणि महाराष्ट्राच्या अकोला अमरावती बुलढाणा या तीन जिल्ह्याच्या सीमेवर असलेले तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड नजीकचे वारी हनुमान मंदिराची स्थापना समर्थ रामदास स्वामींनी केलेली आहे येथून दोन किलोमीटर अंतरावर भैरवगड हे आदिवासी वस्ती असलेले छोटेसे गाव आहे. परंतु आता या गावाला वारी हनुमान म्हणूनच ओळखले जाते. वारी हनुमान येथून सर्वात जवळचे प्रमुख रेल्वे स्थानक अकोला, अकोट आणि शेगाव आहेत. समर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेल्या शक्तिपीठांपैकी एक वारी येथील हनुमानाचे मंदिर सुप्रसिद्ध आहे. या मंदिरात लोकवर्गणीतून, भाविकांच्या देणगीतून, आणि शासकीय निधीतून विकास कामे सातत्याने सुरू आहेत. भाविकांच्या सुविधेसाठी मोठमोठे हॉल आणि भंडारे करण्यासाठी वान नदीच्या काठी निसर्गाच्या सानीध्यात प्रशस्त जागा उपलब्ध आहेत. संपूर्ण वर्षभर येथे भाविकांची रेलचेल असते. येथे हनुमान जयंतीचा मोठा उत्सव दरवर्षी साजरा होत असतो. त्याचप्रमाणे पोळ्याची कर, श्रीराम नवमी, महाशिवरात्री असे अनेक सणांवर येथे भक्तांची गर्दी मावेनाशी होते. येथे श्री हनुमंताची एकाच दगडात कोरलेली महाकाय जागरूक साक्षात मूर्ती असून मूर्तीचे दर्शन घेताच भाविकांना वेगळीच अनुभूती मिळते आणि या मूर्तीच्या दर्शनाने भक्तगण धन्य धन्य होतात.

## थोडक्यात

### कापूस सोयाबीन अर्थसहाय्य योजना २ लाख ४० हजार शेतकऱ्यांना निधी



अकोला : सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन अर्थसहाय्य योजनेत जिल्ह्यातील ३ लक्ष २० हजार ७०५ शेतकऱ्यांपैकी दि. ४ एप्रिल पर्यत २ लक्ष ४० हजार ८०७ शेतकऱ्यांना १११ कोटी ३ लक्ष ४७ हजार ७७० रुपए निधी वितरीत करण्यात आला आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगामात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबतची अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात कार्यरत एचडीएफसी ॲग्रो पिक विमा कंपनीने १५ दिवसांच्या आत स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत पात्र लाभार्थी वांना नुकसान भरपाईची रक्कम रुपये ७७ कोटी अदा करण्यात येईल असे कळविले आहे.अशी माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आली. खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन अर्थसहाय्य योजनेत जिल्ह्यातील ३ लक्ष २०हजार ७०५ शेतकऱ्यापैकी दि. ४ एप्रिल पर्यत २ लक्ष ४० हजार ८०७ शेतकऱ्यांना १११ कोटी ३ लक्ष ४७ हजार ७७० रुपए निधी वितरीत करण्यात आला आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगामात स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबतची अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात कार्यरत एचडीएफसी ॲग्रो पिक विमा कंपनीने १५ दिवसांच्या आत स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत पात्र लाभार्थी यांना नुकसान भरपाईची रक्कम रुपये ७७ कोटी अदा करण्यात येईल असे कळविले आहे.

# पातूर येथे समता पर्वा अंतर्गत तालुकास्तरीय प्रश्न मंजुषा स्पर्धा संपन्न

■महापुरुषांच्या संयुक्त जयंतीनिमित्त घेण्यात आली स्पर्धा
■तालुक्यातील ४२५ विदयार्थ्यांचा परीक्षेला उत्सपूर्त प्रतिसाद

■पातुर,दि १२ (प्रतिनिधी) :



समता पर्वाचा मुख्य उद्देश लोकांना संविधान आणि सामाजिक न्यायाचे महत्त्व समजावणे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणे आहे.याच अनुषंगाने ११ एप्रिल २०२५ रोजी संत सेवालाल म.भवन येथे समता पर्वा अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त तालुकास्तरीय प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सामाजिक उपक्रम हा ग्रामीण युवा बहुउद्देशीय संस्था, युवा लोकचळवळ मंच, व द प्रोफेशनल करिअर बहूउद्देशीय शैक्षणिक संस्था पातूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात ही महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण ग्रामसेवक स्नेहल गवई, युवा लोकचळवळ चे संस्थापक मा.अमोल घायवट, द प्रोफेशनल करिअर अकॅडमीचे संस्थाध्यक्ष ॲड.पंकज पोहरे, जयेंद्र बोरकर योगेंद्र बोरकर, कु.अश्विनी अंभोरे यांच्या हस्ते रितसर करण्यात आले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन इंजि. सतिश देवराव हातोले, अविनाश सुरेश पोहरे, किशोर सुरवाडे, कु. मृणाल इंगळे, सुरेंद्र अवचार, लावण्य अतकर, आशिष शेगोकार,शिलवंत हातोले यांनी अथक परिश्रम घेतले.

व निखिल उपर्वट, हेमंत घुगे, अंबादास इंगळे हे उपस्थित होते. सदर तालुकास्तरीय प्रश्न मंजूषा स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळेतून ४२५ विदयार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या त्यागानेच शिक्षणाची दारे खुली झाली : प्रवीण चोपडे

■पातुर,दि १२ (प्रतिनिधी) :



मनुवादी वर्ण व्यवस्थेत शिक्षण हक्क फक्त ब्राम्हणांनाच होता. ईतरांनी शिक्षण घेणे धर्मशास्त्रानुसार पाप होते. अश्या परिस्थितीत म. फुले स्वतः शिक्षित झाल्यावर महिलांनाही शिक्षण घेता यावे म्हणून त्यांच्या सूविद्य पत्नीला शिक्षित केले. या वेळी त्यांना अनेक हाल सहन करावे लागले.

त्यांनी हा त्याग केल्यानेच आज देशाभारतील महिला शिक्षित झाल्या आणि उच्च पदस्थ अधिकारी झाल्या आणि यशस्वी कारभार पाहू लागल्या आहेत. त्यामुळे त्या क्रांतिसूर्याचे आपल्या सर्व समाजावर थोर उपकार आहेत.क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या त्यागानेच शिक्षणाची दारे खुली झाली असे मत राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण चोपडे यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

दिनांक ११/०४/२०२५रोजी खेडेकर नगर स्थित महारुद्र हनुमान मंदिर प्रांगणामध्ये क्रांती सूर्य जोतिराव फुले यांची १९८वी जयंतीअखिल भारतीय रविदासीया धर्म संघटनेच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी मुख्याध्यापक श्रीराम शेगोकार गुरुजी व प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण चोपडे तर आयोजक तथा प्रस्ताविक मधुकर वानेडकर अमरावती विभाग प्रभारी हे होते यावेळी प्रमुख वक्ते म्हणून पांडुरंग वाडेकर,श्रीराम राखोंडे, शेषराव गव्हाळे, रामभाऊ ताजणे इत्यादीनी महात्मा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

# आत्मबोधचा विसर म्हणजे जीवास दु:ख : हभप संदीप महाराज तायवाडे

■अकोला,दि १२ (प्रतिनिधी)



देहाची आसक्ती व देहाचा अहंकार हा दुखास कारणीभूत ठरतो. कारण यात आत्मबोध चा मनुष्यास विसर पडलेला असतो. मात्र या सुंदर दिसणाऱ्या देहाचाच विसर पडला तर सुख निर्माण होते.भगवंतांची रचनाच अश्या पद्धतीची असल्यामुळे आत्मबोधाचा विसर हा दुखास कारणीभूत होत असल्याचा हितोपदेश हभप संदीप महाराज तायवाडे यांनी केला. कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने वानखडे नगर येथील कर्ता हनुमान मंदिर परिसरात गुरुवर्य वासुदेव महाराज व श्रीराम महाराज यांच्या प्रेरणेने सुरूअसलेल्या कीर्तन उत्सवात चांदुर रेल्वे येथील किर्तनकार हभप संदीप महाराज तायवाडे यांनी कीर्तनाचे अंतिम पुष्प गुंफले.या कीर्तनात त्यांनी संत तुकोबां च्या'देवा आता ऐसा करी उपकार।देवा आता ऐसा करी उपकार।दुःखाचा विसर पाडी मज।तरीच हा जीव सुख पावे मा।'या अभंगावर सुंदर व सारगर्भित कीर्तन सादर केले.ते म्हणाले संत तुकोबांनी भगवंताला माझे चित्त हे तुझ्या चरणी राहो हीच मागणी केली. तुकोबांनी या अभंगात आपले दोष दूर करून आपले चित्त सदा भगवंत सेवेत राहो ही मागणी केली आहे.या अभंगात तुकोबाराय भगवंताची संवाद साधतात. ते पुढे म्हणाले, जीवाचा देहाशी संयोग झाल्यामुळेच दु:खाची निर्मिती होते.

वास्तविक जीव हा भगवंताचा अंश आहे. जीव हा शुद्ध आहे तर शरीर अशुद्ध आहे.शरीराचे हे जग संपूर्ण मिथ्या आहे.अश्या मिथ्या जगात सत्य असणाऱ्या भगवंताशी नित्य संवाद साधून आपले जीवन कृतार्थ करण्याचे आवाहन हभप संदीप महाराज यांनी केले.या समारोपीय कीर्तनात कर्ता हनुमान मंडळाचे अध्यक्ष सुभाष म्हैसने, मुरली धर आवटे, संजयराव देशमुख,विठ्ठलराव चिकटे, चंद्रकांत ताठे, गजाननराव माळी, गजानन धरमकार, विलास आगरकर, हिम्मतराव पोहरे,भगवान पटोकार, संजय वैद्य,मोरे मेजर, भिकुलाल पोपट,शरद कोकाटे, अशोक भिलकर,संजय बहाळ,वसंतराव जायदे, शैलेंद्रसिंह सिसोदिया, भागवत गिरी,शांताराम रोहनकर,संतोष जाधव, महादेवराव खडसाडे, प्रभाकरराव ठाकरे, वसंतराव माळी,भिकाजी भगत ,प्रकाश कुलट, दीपक चतर,अनिल गावंडे,हभप सुखदेवरव पाटकर,दत्ताभाऊ वैद्य,सोपान वत्से,डॉ प्रमोद हेलगे, रमेश शेरेकर, राजुभाऊ टेकाडे,देवलाल उजाडे, डॉ गणेशगिर गोसावी, डॉ तेजराव नराजे, ज्ञानदेव बदरखे, मोहनसिंग सिसोदिया, रामधन राऊत,सौ मंगला ताई म्हैसने समवेत कर्ता हनुमान मंडळ,महिला भजनी मंडळ, विशेष सहकार्यकर्ते व सेवाधारी वर्ग उपस्थित होता.

# ज्योती गाडेकर यांची तालुका महिला अध्यक्षपदी निवड

■तेल्हारा,दि १२ (प्रतिनिधी) :



प्रहार चे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडु यांचे विचाराने प्रेरित होवुन प्रहार अपंग संघटना माजी तालुकाध्यक्ष कैलाश गाडेकर यांचे आकस्मिक निधन झाले पतीचा राजकिय वारसा ,आणि प्रहार परिवार सोबत आठवणीत राहावे हा विचार करूनप्रहार अपंग संघटना अकोला, जिल्हाध्यक्ष मोईन अली,यांचे मार्गदर्शनात महिलाध्यक्षा सौ अरूणाताई काकड, जिल्हा कार्याध्यक्ष संदीप ताथोड यांचे प्रमुख उपस्थितीत आणि हस्ते ज्योती गाडेकर यांना प्रहार अपंग संघटना तेल्हारा महिला तालुकाध्यक्षा पदी नियुक्ति देण्यात आली , ज्योती गाडेकर हया आपले नियुक्ति चे श्रेय महिलाध्यक्षा सौ अरूणाताई काकड, कार्याध्यक्ष संदीप ताथोड यांना देतात.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९१२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# जातीय जनगणना व आरक्षण मर्यादा... दक्षा आणि दिशा

**आम्ही जातीनिहाय जनगणना करू आणि आरक्षणाची ५०% मर्यादा तोडू काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे अलिकडेच केलेले विधान चिंतेचा विषय आहे. यासोबतच, संघराज्य रचनेवर त्याचा काय परिणाम होईल याचाही विचार केला पाहिजे. राहुल गांधी यांनी त्यांच्या भाषणांमध्ये वारंवार जातीय जनगणना करण्याची आणि आरक्षणावरील सध्याची ५०% मयार्दा तोडण्याची गरज अधोरेखित केली आहे. त्यांचा असा युक्तिवाद आहे की जोपर्यंत धोरणे तयार करणे प्रत्यक्ष लोकसंख्येच्या आकडेवारीवर आधारित नाही तोपर्यंत सामाजिक न्याय अपूर्ण राहील. या विधानाचा भारतीय राजकारण आणि समाजात एक पडसाद उमटला आहे.**

----------------

हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा देशात काँग्रेसची अवस्था तिच्या मूळ स्थितीपेक्षाही वाईट आहे. ६४ वर्षांनंतर गुजरातमध्ये झालेल्या काँग्रेस अधिवेशनात हा मुद्दा मोठ्याने उपस्थित करण्यात आला. देशातील सामाजिक संतुलन आधीच एका संवेदनशील टप्प्यातून जात आहे.

काँग्रेसमध्येच असे अनेक नेते आहेत जे स्वतःला या विचारांपासून दूर ठेवू इच्छितात. कारण एक काळ असा होता जेव्हा इंदिरा गांधी स्वतः जातीय जनगणनेच्या विरोधात होत्या.

आज तीच काँग्रेस काँग्रेस अधिवेशनात, संसदेत आणि त्यांच्या निवडणूक प्रचारात हा मुद्दा प्रमुखतेने उपस्थित करत आहे. पण त्याचा परिणाम अनेक राज्यांच्या निवडणुकीत दिसून आला नाही. काँग्रेसचे नुकसान झाले आहे पण तरीही ते या मुद्द्यावर ठाम आहे.



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

भारतातील शेवटचा तपशीलवार जातीचा डेटा १९३१ मध्ये संकलित करण्यात आला होता. त्यानंतर, २०११ च्या जनगणनेत 'सामाजिक-आर्थिक जातीची जनगणना' (SECC) करण्यात आली, परंतु सरकारने त्यांचा जातीचा डेटा सार्वजनिक केला नाही. ओबीसी आणि इतर प्रवर्गांची नेमकी लोकसंख्या देण्यास सरकार कचरत असल्याचा राहुल गांधींचा आग्रह राजकीय आणि सामाजिक चर्चेचा विषय बनला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५०% निश्चित केली होती. 'योग्यता विरुद्ध सामाजिक न्याय' या वादात हा निर्णय संतुलन म्हणून पाहिला गेला. तथापि, तामिळनाडूसारख्या काही राज्यांमध्ये ही मर्यादा आधीच ओलांडली गेली आहे (६९% आरक्षण). राजस्थानसह इतर अनेक राज्यांमध्ये आरक्षण मर्यादा वाढवण्यात आली आहे. आम्ही आरक्षणाची भिंत तोडून टाकू हे राहुल गांधी यांचे विधान राष्ट्रीय पातळीवर या मर्यादेला आव्हान असल्याचे दर्शवते.

राहुल गांधींच्या या मागणीमागे त्यांना असे वाटते की जर जातीची जनगणना झाली आणि लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण लागू केले तर मागासवर्गीयांना त्यांच्या वास्तविक संख्येनुसार सहभाग मिळू शकेल. अचूक डेटा उपलब्ध असल्याने, योजना आणि बजेट वाटपात विशिष्ट वर्गाप्रती संवेदनशीलता वाढू शकते. आतापर्यंत दुर्लक्षित असलेल्या अनेक वर्गांना निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग जाणवेल.

राहुल गांधींच्या या विधानाकडे अनेक लोक सामाजिक न्यायाचे राजकारण म्हणून पाहत आहेत, जे विशेषतः बिहार आणि दक्षिण भारतासारख्या राज्यांमध्ये लोकप्रिय झाले आहे. त्यांना वाटते की यामुळे काँग्रेसला ओबीसी आणि एससी-एसटी समुदायांमध्ये आपला राजकीय पाया मजबूत करण्याची संधी मिळू शकेल.

परंतु त्यांच्या विधानाचे अनेक सामाजिक पैलू असू शकतात, परंतु संघराज्य रचनेसाठी त्याचे राजकीय परिणाम विशेषतः गंभीर आणि दूरगामी असू शकतात.

**जाती ध्रुवीकरणाच्या राजकारणाला प्रोत्साहन :**

या विधानानंतर, राजकीय चर्चेचे केंद्र आता जात बनले आहे, जे वर्ग, मुद्दा आणि धोरण-आधारित राजकारणाला मागे ढकलू शकते. वेगवेगळ्या जाती त्यांच्या संबंधित आरक्षण टक्केवारी आणि प्रतिनिधित्वाची मागणी करण्यासाठी पुढे येऊ शकतात, ज्यामुळे सामाजिक सौहार्दाला गंभीर धक्का बसू शकतो.

**मतपेढीच्या राजकारणाचे पुनरुत्थान:**

जातीवर आधारित आरक्षणाचा मुद्दा मतपेढीच्या राजकारणाला जन्म देऊ शकतो. राजकीय पक्ष आता विकास, शिक्षण आणि रोजगार यासारख्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष करून जातीय संतुलन लक्षात घेऊन तिकिटे वाटप आणि जाहीरनामे तयार करण्यास सुरुवात करतील. यामुळे राजकीय चर्चेचा दर्जा घसरू शकतो.

**विरोधी पक्षांकडून येणाऱ्या प्रतिक्रिया आणि देशभरातील अस्थिरता:**

सत्ताधारी पक्ष असल्याने, भाजप मागे न हटता या मुद्द्यावर राजकीय प्रतिक्रिया देत आहे. यामुळे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षांमध्ये तीव्र वैचारिक संघर्ष निर्माण होऊ शकतो, जो संसदेपासून रस्त्यांपर्यंत पसरू शकतो. काही राज्य सरकारेही याला विरोध करू शकतात, ज्यामुळे संघराज्य रचनेत असंतुलन निर्माण होऊ शकते.

**गुणधर्म विरुद्ध आरक्षण वादविवाद तीव्र स्वरूप धारण करतो:**

शहरी आणि उच्चशिक्षित वर्गात, या विधानाकडे गुणधर्मावर अन्याय म्हणून पाहिले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनांची, निदर्शनांची आणि न्यायालयीन याचिकांची संख्या वाढू शकते. या प्रकारच्या राजकीय अस्थिरतेमुळे निवडणुकीत अराजकता निर्माण होऊ शकते.

**न्यायालयीन संघर्षाची शक्यता:**

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५०% निश्चित केली असल्याने, ही मर्यादा तोडण्याचा कोणताही प्रयत्न कायदेशीर संघर्षाला कारणीभूत ठरू शकतो. यामुळे संविधानाच्या व्याख्येवर एक नवीन वाद निर्माण होऊ शकतो आणि धोरण ठरवण्यात गुंतागुंत वाढू शकते. न्यायालयांमधील प्रलंबित खटल्यांच्या संख्येवरही याचा परिणाम होऊ शकतो.

**आंतरजातीय संघर्षाची भीती :**

जेव्हा वेगवेगळ्या जाती आरक्षणात आपला वाटा मागतात, तेव्हा एकमेकांविरुद्ध असंतोष, मत्सर आणि संघर्षाच्या भावना वाढू शकतात. यामुळे सामाजिक सौहार्द आणि राजकीय स्थिरता धोक्यात येऊ शकते, विशेषतः ज्या राज्यांमध्ये जातीय समीकरणे आधीच नाजूक आहेत.

**राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत फूट पडण्याची शक्यता :**

राहुल गांधींच्या या विधानानंतर, काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांमध्येच मतभेद निर्माण होऊ शकतात. काही नेते या विधानाचे समर्थन करू शकतात, तर काही जण ते राजकीय धोका मानू शकतात. यामुळे विरोधी आघाडींमध्ये फूट पडण्याची शक्यता वाढते.

●●●●●●

# राज्यपालांचे पक्षीय राजकारण

सर्वोच्च न्यायालयाने अप्रतिम निर्णय दिल्यामूळे राज्यपालांच्या पक्षीय राजकारणाला खिळ बसू शकेल, अशी परिस्तिथी आता निर्माण झाली आहे. तामिळनाडू सरकार विरुद्ध राज्यपाल या निर्णयात तामिळनाडू सरकारचा विजय झाला आहे.

तामिळनाडूचे मूख्यमंत्री एम के स्टॅनीन यांनी या निर्णयाचे स्वागत केले असले तरी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामूळे भारतीय राजकारणाला नवी कलाटणी मिळाली आहे. तामिळनाडू विधानसभेने पारीत केलेले 10 विधेयके तामिळनाडूचे राज्यपाल रवी यांनी गेल्या अनेक वषार्पासून थांबवून ठेवली होती. त्यामुळे तामिळनाडू सरकारने आखलेल्या जनसामान्यांचा योजना योग्य प्रकारे राबवितांना अडचण निर्माण होत होती.

राज्यपालाचे अधिकार व कर्तव्य भारतीय राज्यघटनेच्या कलम 153 ते 167 मध्ये नमूद केलेले आहेत. मात्र अलीकडच्या काळात पक्षीय दृष्टीकोन ठेवून राज्यपालांची वर्तवणूक सुरु होती. यावर आता भविष्य काळात आळा बसणार आहे.

अनेक राज्यात विरोधी पक्षाची सरकारे असली म्हणजे केंद्रातील सरकार आपल्या खेम्यातील व्यक्तीची राज्यपाल म्हणून निवड करन्याचा पायडा गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे.जी व्यक्ती पक्षिय निष्ठा जोरकसपणे राबवेल त्या व्यक्तीला राज्यपाल म्हणून नियुक्त करण्याचा खेळ केंद्र सरकार कडून सातत्याने करण्यात आला आहे. याला तामिळनाडूचे राज्यपाल रवि अपवाद नाहीत.

लोकनियुक्त सरकारचे महत्वाचे निर्णय दाबून ठेवणे हा सध्याच्या राज्यपालांचा आवडता विषय झाला आहे. ज्या राज्यात सत्ताधारी पक्षाची सरकारे आहेत तिथे मात्र राज्यपाल व राज्य सरकार यांच्यात वादाची ठिणगी पडल्याचे दिसून येत नाही.

मात्र काही राज्यात राज्यपाल व राज्य सरकार यांच्यात वाद निर्माण झाल्याने अनेकांनी राज्यपाल हे पद नष्ट करावे आणि मागणी केली होती.पद,प्रतिष्ठा सन्मान याला दूर सारुन राज्यपालांनी अनेक निर्णय घेतले असल्याने इतिहासात स्पष्ट दिसून येते.

नितीन कैलासराव गोहने
हिरापूर, ता.सावली, जि.चंद्रपूर.
8275393387

दिल्ली विधानसभेत आम आदमी पक्षाची सत्ता असताना अरविंद केजरीवाल हे मुख्यमंत्री होते. नायब राज्यपाल म्हणून व्ही.के.सक्सेना काम पाहत होते.अनेक मुद्यावर आम आदमी पार्टी व नायब राज्यपाल यांच्यात संघर्ष निर्माण झाला होता. तत्कालीन काळात दिल्ली सरकारने सरकारच्या जाहिरातीवर 97 कोटी रुपये खर्च केले होते.

आपल्या सरकारच्या योजना जनसामान्यांपर्यंत पोहचाव्यात यासाठी अरविंद केजरीवाल यांनी राजकीय प्रचार व प्रसिद्धीसाठी 97 कोटी खर्च केले होते. हा खर्च आम आदमी पक्षांकडून वसुल करणात यावा अशी भूमिका तेव्हाचे दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही.के.सक्सेना यांनी पत्र लिहून केली होती. जेव्हा - जेव्हा काही मुद्दे समोर आले, तेव्हा तेव्हा नायब राज्यपालांनी दिल्ली सरकारला वेठीस धरण्याचा प्रयत्न केला होता. देशातील इतर राज्यातील परीस्थिती याहून निराळी नाहीच.महाराष्ट्रात सुद्धा भगत सिंग कोश्यारी हे राज्यपाल असताना मूख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना बराच त्रास सहन करावा लागला होता.

राज्यातील मंदिरे, धार्मिक स्थळे खुली करण्यावरून कोश्यारी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून वाद निर्माण केले होता. त्याच भाषेत उद्धव ठाकरे यांनी राज्यपालांना खरमरीत पत्र लिहून जशास तसे उत्तर दिले होते. राज्य विद्यानपरीषदेच्या 12 जागांची निवड प्रक्रिया भगतसिंग कोश्यारी यांनी जाणूनबुजून थांबवून ठेवलेली होती.

थोर पुरुषावर टीका केली होती.राज्यपालांच्या पक्षपाती धोरणा विरोधात जेष्ठ नेते शरद पवारांनी कोश्यारी यांची तक्रार पंतप्रधानाकडे केली होती. शेवटी मूदा एकच की, राज्यपाल पक्षीय दृष्टीकोन ठेऊन काम करतात हा विषय सर्वमान्य होऊ लागला.

आता सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालाचा अधिकार क्षेत्राच्या अनुषंगाने निर्णय दिल्यामुळे राज्यांनी निर्माण केलेली विधयके जलद गतीने मंजूर होतील.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आता एक महिन्याच्या आत राज्यपालांना विधेयक मंजूर करावे लागणार आहे. घटनेच्या कलम २०० नुसार एखादे विधेयक राज्याच्या विधानसभेकडून पारित झाले असेल तर राज्यपालांना त्या विधेयकास अनुमती द्यावी लागेल किवा अनुमती रोखून ठेवावी लागेल असे प्रावधान आहे. मात्र घटनेच्या कलम २०० चा गैरफायदा घेऊन विरोधी पक्ष्याच्या राज्यातील राज्यपालांनी अनेक विधेयक अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवल्याचे चित्र आहे. यातून राज्यघटनेच्या तरतुदीचा भंग झालेला आहे. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय महत्वपूर्ण आहे.

राज्यघटनेच्या ३५६ कलमाच्या वापर अलीकडील काळात दिसून येत नाही. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती उत्तम नाही. म्हणून केंद्र शासनाकडून ३५६ कलमाचा वापर करून राज्यात राष्ट्रपती राजवट लावण्याचे कार्य करीत असे. आता मात्र अलीकडील काळात असा वापर केल्या जात नसल्याचे दिसून येत असले तरी मात्र जनतेच्या हिताचे निर्णयाचे विधेयक रोखून ठेवण्याचे पाप राज्यपालांकडून होतच होते. याला आळा घालणे आवश्यक होते.

राज्यपाल हे पद केंद्रशासन व राज्यशासन यांना जोडणारा दुवा असून त्याद्वारे भारतीय संघराज्यातील राजकीय एकात्मीकरण साधण्यात येते.अलीकडे आपल्या राजकीय फायद्यासाठी आपल्याच व्यक्तीची, पक्षनिष्ठा बाळगणाऱ्या व्यक्तीची राज्यपाल म्हणून नियुक्ती केली जाते. जेव्हा पक्षीय नेत्यांची निवड राज्यपाल म्हणून केली जाते. तेव्हा संघर्ष हा अटळ असतो.

प्रतिष्ठा, मान, सम्मान, यांना ठेच पोहोचणार नाही असे संकेत असतांनाही प्रतिष्ठा, मान, सम्मान, याला ठेच पोहोचविल्या जात आहे.यातून सामान्य माणसाचा राजकारणावर पुन्हा रोष व्यक्त होण्यास मदत होत आहे.

राज्यपाल हे घटनात्मक आणि अत्यंत महत्वाचे असे पद आहे. पण तेच एखाद्या राजकीय पक्ष्याच्या कार्याकर्त्यासारखे वागू लागले तर लोकांनी अपेक्षा ठेवायची कुणाकडून असा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यपालांनी राज्य सरकारला मित्र, मार्गदर्शक, म्हणून कार्य केले पाहिजे, असा लोकशाहीचा संदेश आहे.

आज राजकारण विचित्र वळणावर आहे. राजकारण्यांकडून अपेक्षा भंग झालेला आहे. रोज रोज भ्रष्टचाराची प्रकरणे बाहेर येत आहे. धनंजय मुंडे यांनी परळी-वैद्यनाथ येथे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असतांना ७२ कोटी रुपयांची रक्कम काम न करता उचलून खाल्ली.असा पुरव्या निशी आरोप सुरेश धसांनी केलेला आहे. यातील सत्य उघडीस येण्यास बराच वेळ लागणार आहे.

प्रकरणं बाहेर येतात नंतर त्या प्रकरणाचे काय होते, ते कळतच नाही अशी लोकांची ओरड आहे. कामे न करता 72 कोटी रुपयांची उचल धनंजय मुंडे यांनी केली असेल, तर त्याची चौकशि व्यायलाच हवी.लोकशाही राज्यात अशा प्रकारच्या वाढत्या घटनांमुळे लोकांचा राजकारनावर रोष आहे. नैतिक मुल्ये पायदळी तुडविली जात आहेत. नव्या भारताच्या निर्मितीकडे आपण लक्ष देत असू तर राजकारन्यांनी आपल्या वर्तवनूकीतून नैतिक मूल्याचे आचरण करणे महत्वपूर्ण आहे.

संविधानाच्या चौकटीत राहून यापुढे राज्यपाल काम करतील अशी अपेक्षा करायला हरकत नाही. यापुढे राज्यसरकार व राज्यपाल यांच्यात संघर्षाच्या नवनवीन कहाण्या निर्माण होणार नाहीत अशी अपेक्षा करू या. तामिळनाडू सरकार विरुद्ध राज्यपाल या खटल्यात योग्य निर्णय देवून सर्वोच्च न्यायालयाने नवीन मार्गदर्शक तत्वे पुढे आणलीत. त्याबद्दल न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणी आर. महादेवन यांचे मनपूर्वक अभिनंदन. ■ ■ ■

# दमदार अभिनयाचे दुसरे नाव बलराज साहनी



अनेक हिंदी चित्रपटातून आपल्या अभिनयाचा अमिट ठसा उमटविणारे अभिनेते बलराज साहनी यांचा आज स्मृतीदिन.

बलराज साहनी यांचे खरे नाव युधिष्ठिर साहनी असून त्यांचा जन्म १ मे १९१३ रोजी पंजाबच्या सरगोधा जिल्ह्यातील भेरा (आता पाकिस्तान) या गावी एका पंजाबी खत्री कुटुंबात झाला होता. लाहोर विद्यापीठातून इंग्लिश साहित्य व हिंदी विषयांत पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी काही काळ रावळपिंडी येथे कौटुंबिक व्यवसायात व्यतीत केला.

पुढे १९३० साली ते पत्नी दमयंतीसह रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनात अध्यापनासाठी गेले. महात्मा गांधींसोबत काही काळ काम केल्यानंतर ते १९३८ साली लंडन येथील बी.बी.सी.च्या हिंदी विभागात निवेदक म्हणून रुजू झाले. तेथे ते १९४३ पर्यंत होते.

'इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन' (आय.पी.टी.ए.) व 'पंजाबी कला केंद्राचे' ते संस्थापक सदस्य होते. पुढे हिंदी चित्रपट सृष्टीत पाय रोवलेल्या बलराज साहनी यांना एकामागोमाग एक चित्रपट मिळू लागले. १९४६ मध्ये दूर चले, बदनामी हे त्यांचे चित्रपट आले. पुढे गुडीया, गुंजन चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. परंतु, हे चित्रपट फारसे चालले नाहीत. १९५० मध्ये आलेल्या धरती के लाल या चित्रपटाने त्यांना ओळख मिळवून दिली. नंतरच्या काात मालदार, हमलोग, हलचल, बदनाम, राही, भाग्यवान, मजबुरी, औलाद, बाजूबंद सीमा अशा अनेक चित्रपटात त्यांनी भूमिका साकारल्या. परंतु, वक्त, दो बिघा जमिन, देवर भाभी, छोटी बह्य, हमराज, निलकमल यासारख्या चित्रपटातील त्यांच्या भूमिका कायम स्मरणात राहतील, अशाच ठरल्या.

बलराज साहनी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुण्यात बलराज साहनी-सहिर लुधियानवी फाउंडेशन स्थापन झाले आहे. या फाउंडेशनतर्फे दर वर्षी एका अभिनेत्याला बलराज साहनी पुरस्कार दिला जातो. २०१७ साली हा पुरस्कार विक्रम गोखले यांना मिळाला.

बलराज साहनी यांनी पंजाबी नियतकालिक 'प्रीतलारी' मधून नियमित लेखन केले. मेरा पाकिस्तानी सफर, मेरी फिल्मी अमरकथा (आत्मचरित्र), मेरा रूसी सफरनामा ही त्यांची पुस्तके प्रकाशित झालीत. त्यांना १९६९ मध्ये पद्मश्री पुरस्कार आणि नंतर सोव्हिएट लँड नेहरू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १३ एप्रिल १९७३ रोजी या कसलेल्या अभिनेत्याचे निधन झाले. ओ मेरी जोहरा जबी... हे त्यांच्यावर चित्रीत गाणे आजही चित्रपट सृष्टीसह चाहत्यांमध्ये कमालीचे लोकप्रिय आहे. ■ ■ ■

# कॅल्शियम कार्बाइड वापरून पिकवलेले आंबे हानिकारक



भारतीय बाजारपेठेत आंब्याचा हंगाम सुरू झाला आहे. आंबा हा उन्हाळ्यातील सर्वात आवडत्या फळांपैकी एक आहे. ते केवळ चवीलाच अद्भुत नाही, तर आरोग्यासाठीही फायदेशीर मानले जाते. तथापि, आंब्याच्या वाढत्या मागणीत, काही लोक आंब्याला लवकर पिकवण्यासाठी रसायनांचा वापर करतात. विशेषतः यासाठी कॅल्शियम कार्बाइड सारख्या धोकादायक रसायनांचा वापर केला जातो, जे हानिकारक आहे.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. अशा बेकायदेशीर कामांमध्ये सहभागी असलेल्यांवर एफएसएस कायदा, २००६ आणि त्याच्याशी संबंधित नियमांनुसार कठोर कारवाई करावी, असेही म्हटले आहे.

कॅल्शियम कार्बाइड हे एक रसायन आहे, जे सामान्यतः कारखान्यांमध्ये वापरले जाते. काही लोक फळे लवकर पिकवण्यासाठी बेकायदेशीरपणे याचा वापर करतात. अशी फळे बाहेरून पिकलेली दिसतात, पण आतून कच्ची राहू शकतात, जी आरोग्यासाठी हानिकारक आहे. म्हणूनच भारत सरकारने फळे पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर बंदी घातली आहे.

कॅल्शियम कार्बाइड वापरून पिकवलेल्या आंब्यांमध्ये नैसर्गिक गोडवा आणि पोषण कमी असते. त्याचा पचनसंस्थेवरही परिणाम होतो. जास्त वेळ ते खाल्ल्याने गॅस, ॲसिडिटी आणि यकृताचे विकार यासारख्या समस्या उद्भवू शकतात. हे आंबे विशेषतः मुले, वृद्ध आणि गर्भवती महिलांसाठी धोकादायक ठरू शकतात.

उन्हाळ्यात बाजार रंगीबेरंगी आंब्यांनी भरलेला असतो. आंबा नैसर्गिकरित्या पिकवला आहे की रासायनिक पद्धतीने पिकवला आहे हे तुम्ही त्याच्या चव, रंग, सुगंध आणि पोत यावरून बऱ्याच प्रमाणात ओळखू शकता.

जर आंबा बाहेरून चमकदार पिवळा आणि आतून कडक असेल तर तो रसायनांचा वापर करून पिकवला जात असावा. नैसर्गिक आंब्याचा रंग थोडा असमान असतो. नैसर्गिक आंब्यांना गोड आणि ताजा वास येतो, तर रासायनिक पद्धतीने पिकवलेल्या आंब्यांना वास नसतो किंवा थोडासा तीक्ष्ण वास असतो. रसायनांचा वापर करून पिकवलेले आंबे चवीला मंद किंवा विचित्र असू शकतात.

जर आंबा स्पर्श केल्यावर खूप मऊ किंवा कडक वाटत असेल, तर तो रसायनांचा वापर करून पिकवल्यामुळे असू शकतो. नैसर्गिक आंबे थोडे मऊ असतात.

घरी आंबे पिकवण्यासाठी, ते कागदात गुंडाळा आणि खोलीच्या तपमानावर ठेवा किंवा पेंढ्यात दाबून ठेवा. आंबा २-३ दिवसांत नैसर्गिकरित्या पिकेल. ही पद्धत सुरक्षित आहे. असे आंबे खाल्ल्याने आरोग्याला हानी पोहोचत नाही.

प्रत्येक राज्यात अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग असतो. तुम्ही तुमच्या जिल्ह्याच्या अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकता. ■ ■ ■

# जालियनवाला बाग हत्याकांड स्मृतिदिन

जालियनवाला बाग हत्याकांड 13 एप्रिल 1919 रोजी घडले. या हत्याकांडाने देशाच्या स्वातंत्र्यलढावर खूप मोठा परिणाम झाला. क्रांतीची आग आणखी भडकली . मार्च 1919 मध्ये ब्रिटिश सरकारने रौलट ॲक्ट पास केला.

या कायद्यामुळे देशद्रोहाचा आरोप असलेल्या कुठल्याही व्यक्तीला, कोणतीही चौकशी न करता, कोणताही खटला न चालवता तुरुंगात टाकण्याचा अधिकार पोलिसांना मिळाला .त्यामुळे या कायद्याविरोधात देशभरात असंतोषाची लाट उसळली. प्रखर विरोध होऊ लागला होता. एप्रिलमध्ये अमृतसर येथे या कायद्याविरोधात ठिकठिकाणी आंदोलने झाली. सत्यपाल आणि डॉक्टर सैफुद्दीन हे या आंदोलनाचे नेते होते. त्यांना अटक करण्यात आली.आणि या अटकेचा निषेध म्हणून 15 ते 20 हजार लोक शांततापूर्ण आंदोलन करण्यासाठी जालियनवाला बाग येथे जमले होते. व्यासपीठावर भाषणं सुरू होती आणि अचानक ब्रिग्रेडियर जनरल डायर तिथे आपल्या फौज-फाट्यासह पोहोचला .

क्षणाचाही विलंब न करता, कुठलीही वार्निंग न देता पोलिसांना त्याने फायरिंगचे आदेश दिले. अचानक गोळीबार झालेला पाहून तिथे प्रचंड गोंधळ उडाला. लोक सैरभैर पळू लागले. पण पोलिसांनी बागेतून बाहेर जायचा रस्ताच बंद करून ठेवला होता. काही लोक भिंतीवर चढत होती त्यांनाही गोळ्या मारल्या. शेवटी कुठलाच मार्ग नाही म्हणून लोकांनी (ज्यामध्ये स्त्रिया, मुलं, पुरुष, अपंग, वृद्ध होती ) बागेतल्या विहिरीत उड्या घेतल्या. पण त्या निर्दयी, हृदय शून्य, क्रूर जनरल डायरने इथेही गोळ्या मारायला सांगितलं.

वरून पोलीस गोळ्या मारत होते आणि विहिरीत लोक तडफडून मरत होते .तब्बल दहा मिनिटे सगळीकडे रक्तपात, मृत्यूचे तांडव चालू होते. सर्वत्र आरोळ्या ,किंकाळ्या, रक्ताच्या चिरकांड्या आणि बंदुकीचे आवाज आसमंतात घुमत होते. सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले होते. काहीच कुणाला दिसत नव्हते .जो तो जीवाच्या आकांताने पळत होता.

जेव्हा पोलिसांच्या बंदुकीतील गोळ्या संपल्या तेव्हाच गोळीबार थांबला. एखाद्या शैतानालाही लाज वाटावी असा नरसंहार त्या क्रूर डायरने जालियनवाला बागेत घडवला. ब्रिटिशांची आकडेवारी 400 ते 500 लोकच यात मेली असे सांगते. पण प्रत्यक्षात हजारच्या वर लोकं मरण पावली. आणि 5000 पेक्षा जास्त लोक जखमी झालीत. त्यांना कुठलीही वैद्यकीय मदत मिळाली नाही. यामुळे संपूर्ण देशात ब्रिटिशांविरुद्ध संतापाची लाट उसळली. ज्या वेगाने तो राक्षस आला त्याच वेगाने नरसंहार करून तो निघून गेला. मागे ठेवून गेला फक्त आकांत.

बागेत प्रेतांचा खच पडला होता. एवढं करूनही जनरल डायरचे समाधान झाले नाही तर त्याने संपूर्ण शहराची विज आणि पाणी बंद केले. ब्रिटिश सरकारने या साऱ्या प्रकरणाची दखलच घेतली नाही. उलट त्याला क्लीनचीट दिली. आणि त्याला भारतात काम करण्यावर मनाई केली.

अशा या जनरल डायरचा आजारपणामुळे 1927 मध्ये इंग्लंडमध्ये मृत्यू झाला. याचा बदला म्हणून 21 वर्षानंतर उधमसिंग याने सर माइकल ओ डायर याला गोळ्या घालून ठार केले .कारण सर मायकल ओ डायर याने जालियनवाला बाग हत्याकांडाचे समर्थन केले होते. ब्रिटिश साम्राज्यातील एक काळा अध्याय म्हणून या हत्याकांडाची इतिहासात नोंद झाली .

---------------

सौ. माधवी पत्की, नागपूर.

■ ■ ■

# टी.डी.एस. आणि टी.सी.एस. म्हणजे काय?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना

आज पासून आपण नवीन परंतु अत्यंत महत्वाच्या विषयावर सविस्तर चर्चा करणार आहोत. आपण ळऊर तथा ळउर या विषयाची माहिती घेणार आहोत. आज ळऊर - ळउर हे अत्यंत महत्वाचे या साठी पण आहे की जर ही कपात करण्यात आली नाही तर त्यासाठी फार मोठी पेनाल्टी करदात्यास दयावी लागते. या बद्दल ची पूर्ण तंतोतंत ताजी माहिती आपण नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रूपात बघणार आहोत.

**प्रश्न : टी.डी.एस. म्हणजे काय?**

■ पूर्वी करदात्यास उत्पन्न झाल्यानंतर किंवा अग्रीम टॅक्स याद्वारे टॅक्स वसुली सरकार करायची परंतु नंतर सरकारच्या लक्षात आले की जर कर वसुली उत्पन्नाच्या स्त्रोतापासूनच करण्यात त्यांची वसुली धावपळ कमी होईल आणि टॅक्स ची वसुली पण ताबडतोब होईल. या मुळे करचोरी वर सुद्धा लगाम बसेल या मूळ उद्देशाने टी.डी.एस. कल्पना सुरु करण्यात आली.

**प्रश्न : टी.डी.एस.ची संकल्पना काय आहे?**

■ याची मूळ संकल्पना आहे की उत्पन्नाच्या स्त्रोतापासून म्हणजेच source मधूनच करवसूल करण्यात यावा. या अनुसार ज्या एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीला पेमेंट करायचे असेल, त्यांनी पेमेंट मधूनच काही ठराविक रक्म कापून घ्यावी तथा ही रक्म केंद्र सरकारच्या खात्यात भरावी. यालाच दुसऱ्या सोप्या भाषेत TDS म्हणतात यालाच Tax deducted at source असे म्हणतात

**प्रश्न : TCS म्हणजे काय?**

TCS म्हणजे Tax collected at source म्हणतात हा ही सरकारच्या टॅक्स वसुलीचा प्रकार आहे या मुळे ही इन्कमटॅक्स वसुली लवकर होते तथा टॅक्स चोरीला ही आळा बसतो ळऊर आणि ळउर हे करवसुलीचे महत्त्वाचे मूळ साधन आहे.

**प्रश्न : टी.डी.एस आणि टी.सी.एस. (TDS vs TCS) या दोन्ही मध्ये महत्त्वाचे फरक काय आहे?**

■ TDS आणि TCS हे कर वसुली चे महत्वाचे मूळ घटक आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये. जेव्हा रकम एका निश्चित मर्यादेपेक्षा जास्त असते तेव्हा केलेल्या पेमेंट मधून कापला गेलेली रकम म्हणजे टॅक्स ची रकम यालाच TDS म्हणतात. तर विक्रेत्यांनी खरेदी द्वारा सोबत व्यवहार करतांना जी रकम गोळा करून केंद्र सरकारला देतो, त्या रकमेला TCS असे म्हणतात.

आपण या दोन्हीची सविस्तार चर्चा व फरक पुढे बघणार आहोत. TDS आणि TCS ची इन्कमटॅक्स योजनेचे उद्देश्य , फायदे व काही उजीवा ही आहेत, त्या काय आहेत या बद्दल आपण पुढे चर्चा करणार आहोत. याचे कपाती रेट काय आहे, हे कापलेले पैसे कधी भरावे, उशीरा सरकारला दिल्यास काय पेनाल्टी लागते अशा अनेक महत्वाच्या विषयावर आपण पुढे चर्चा करणार आहोत. TDS भरण्याची कॉर्टर-4 ची शेवटची तारीख 31 मे आहे म्हणजे मार्च एन्ड ची, तथा TCS ची शेवटची तारीख 15 मे आहे म्हणून आतापासून लक्ष देणे महत्वाचे आहे. ■ ■ ■

# अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## सवयींचा प्रभाव . !!

चांगल्या की वाईट सवयी
आपणच घेतो लाऊन
त्यावर आपलं भविष्य
असतं ना भौ अंवलंबून ..

ज्या गोष्टी करणे येते जिवावर
त्याच देती जीवनाला आधार
व्यायामाचा येई कंटाळा
पण शरीर बनते ना पिळदार . .

शाळेत जातांना बालके रडतात
म्हणून का पालक घरी ठेवतात?
शिक्षणाविणा होईल का प्रगती ?
चांगल्या सवयीची असावी निती..!

## बस चार्जिंग सेंटरसाठी केबल टाकण्याचे काम पूर्ण

**अकोला :** महापालिकेला केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या ई-बससाठी लागणाऱ्या चार्जिंग स्टेशनसाठी इलेक्ट्रिक केबल टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. एक केव्ही क्षमतेचे तीन ट्रान्सफार्मर उभारणीचे काम लवकरच सुरु होणार आहे. महापालिकेला शहर बस वाहतुकीसाठी ४१ ई-बस मिळणार आहेत. या बस बॅटरीवर धावणार असल्याने शहरात प्रदुषण होणार नाही.

या अनुषंगाने महापालिकेने खडकी परिसरात तीन एकर जागा घेतली. या जागेत ई-बस चार्जिंग सेंटर तसेच डेपो तयार करण्यात येणार आहे. ई-बस चार्जिंग स्टेशनसाठी एक्सप्रेस फिडरची आवश्यकता होती. त्यामुळे जागेपासून जवळपास एक किलोमिटर अंतरावर असलेल्या ३३ केव्ही केंद्रातून सब ट्रान्सफार्मर बसवुन एक किलोमिटर अंतरापर्यंत १ केव्हीच्या केबल टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. यासाठी दोन कोटी ५० लाख रुपये खर्च महापालिकेला करावा लागला.

याच बरोबर या जागेत १ हजार केव्हीचे तीन ट्रान्सफार्मर उभारले जाणार आहेत. ट्रॉन्सफार्मर जागेत दाखल झाले आहेत. येत्या काही दिवसात ट्रॉन्सफार्मअर उभारण्याच्या कामास प्रारंभ होईल.

### अकोल्यातील जुने बसस्थानक प्रांगणात
# साकारणार महामानवाची महारांगोळी

**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून अकोल्यात ऐतिहासिक अशी १८००० चौरस फूट आकाराची भव्य दिव्य रांगोळी साकारण्यात येणार असून त्या रांगोळीच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यात येणार असल्याची माहिती प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव प्रकाश तायडे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण, प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती सेलचे महेंद्र गवई, कलाध्यापक संघाचे राज्य प्रसिद्धी प्रमुख संजय आगाशे, सुभाष धार्मिक, संदीप शेवाळकर आदी उपस्थित होते.



दरवर्षी १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध समाजपयोगी उपक्रम राबवित साजरी करण्यात येते. यंदा जागतिक पातळीवर अकोल्याच्या उपक्रमाची नोंद होणार आहे. कारण अकोल्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त आगळेवेगळे अभिवादन करण्यासाठी तब्बल १८००० चौरस फूट जागेत भव्य दिव्य अशी रांगोळी काढण्यात येणार असून त्याची पूर्व नोंद ही गिनिज बुक्स, इंडिया बुक्स यामध्ये सुद्धा करण्यात आली. ही भव्य दिव्य रांगोळी काढण्याचे कामाला शनिवारी ( ता. १२ एप्रिल ) संध्याकाळपासून प्रारंभ करण्यात आला असून ही रांगोळी रविवारी मध्यरात्री पूर्ण होणार आहे. तब्बल २००० किलो रांगोळीचा वापर करण्यात येणार आहे. ही भव्य दिव्य अशी रांगोळी काढण्यासाठी तब्बल ४० जणांची टीम कामाला लागणार असून यासाठी अंदाजित ४० तासांचा कालावधी लागणार असल्याची माहिती प्रकाश तायडे यांनी दिली.

या चाळीस जणांच्या टीम मध्ये ३० पुरुष आणि १० महिलांचा समावेश असणार असल्याची माहिती आयोजकांनी यावेळी दिली. तर या कार्यक्रमाला सर्वच राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार असून ही महामानवाला एक आगळीवेगळी अशी मानवंदना ठरणार असल्याचा विश्वास यावेळी आयोजकांनी व्यक्त केली. या ठिकाणी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक अशा अविस्मरणीय क्षणाचा आनंद घ्यावा असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

## बाळापूर वाडेगाव रस्त्यावर दुचाकी व ट्रकमध्ये अपघात दुचाकी स्वार ठार

**बाळापुर,दि १२ (प्रतिनिधी) :** वाडेगाव रोडवरील कॉबडे बाबाच्या मंदिराजवळ धनेगावच्या पुढे दुचाकी व ट्रकचा भीषण अपघातझाल्याची घटना गुरुवार दि. १० एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास घडली असून या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागेवरचं मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. प्राप्त माहिती नुसार कडूनवाडेगाव बाळापूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रक क्र.एम.पी. १३ झेड पी १२८६ या ट्रक ने बाळापूर कडून वाडेगावच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकी क्र. एम. एच ३० ए डब्ल्यू ५९५१ ला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकी स्वार गंभीर जखमी झाला. या अपघाताची माहिती मिळताच बाळापूर पोलिसांनी घटना स्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला व अपघात ग्रस्त गंभीर युवकाला रुग्णवाहिकेने रुग्णालयात रवाना केले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.पोलिसांनी मृतदेह पुढील उत्तरीय तपासणी करीता बाळापूर ग्रामीण रुग्णालय येथे रवाना केला. अपघातात मरण पावलेल्या दुचाकीस्वाराचे नावं सुपोत किसन डोंगरे वय ३५ वर्ष रा. शेळद ता. बाळापूर जि. अकोला हे असून सदर युवक वाडेगाव येथील एका बार रेस्टोरंटवर काम करतं होता. तो वाडेगाव येथे काम ावर जातं असतांनाच काव्याने घाला घातला आणि सुपोत या जवान युवकाचा आपघातात दुदैवी मृत्यू



झाला. या घटनेमुळे शेळद गावात हळहळ व्यक्त केली जातं आहे. या घटने संदर्भात नातेवाईकांच्या फियादी वरून बाळापूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील कारवाई बाळापूर पोलीस करीत आहेत.

## होमिओपॅथीच्या विकासासाठी कटिबद्ध : खा. अनुप धोत्रे

**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** दिनांक १० एप्रिल गुरुवार रोजी होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशन, अकोला तर्फे डॉक्टर सॅम्युअल हनेमन यांची जयंती साजरी करण्यात आली जगभर १० एप्रिल हा दिवस डॉ. सॅम्युअल हनेमन यांची जयंती म्हणून व होमिओपॅथिक दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे अवचित्य साधून होमिओपॅथिक डॉक्टर असोसिएशन, अकोला ने होमिओपॅथिक डॉक्टरांचे सांस्कृतिक कार्यक्रम, सत्कार, संगीत रजनी इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष डॉ. प्रवीण अग्रवाल यांनी केले होते.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अकोलाचे खासदार श्री अनुप धोत्रे, आम दार श्री रणधीर भाऊ सावरकर, माजी महापौर श्री विजय भाऊ अग्रवाल, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमि ओपॅथी चे प्रशासक डॉ. बाहुबली शहा हे उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. दीपक वखारिया, डॉ. पार्थसाथी शुक्ला, डॉ. अशोक अग्रवाल, डॉ. दीपक केळकर, डॉ. आशिष गिरे, डॉ. शरद जावळे इत्यादी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. नंतर मान्यवरांचे सत्कार, संगीत रजनी, सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले, पाहुण्यांचे स्वागत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी खासदार श्री अनुप धोत्रे यांनी होमिओपॅथीच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. माजी महापौर विजय अग्रवाल यांनी सुद्धा होमिओपॅथीच्या विकासासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. प्रस्तावनेमध्ये डॉ. प्रवीण अग्रवाल यांनी संघटनेबद्दल व होमिओपॅथीच्या कार्याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सपना राजपूत व डॉ. वर्षा राव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी करिता सचिव डॉ. प्रशांत सांगळे, डॉ. मंगेश तुळसकर, डॉ. प्रशांत इंगळे, डॉ. आदित्य नानोटी, डॉ. शितल तुळसकर, डॉ. श्रद्धा राजा, डॉ. उज्वल वांगे, डॉ. नरेन श्रीवास, डॉ. प्रद्युम्न शाह, डॉ. प्रवीण देशमुख, डॉ. वृषाली सिंगई, डॉ. अंकिता जयस्वाल, डॉ. हर्षा कोल्हे यांनी परिश्रम घेतले.

## तहसील कार्यालयात वॉटर कुलर दिले भेट

**तेल्हारा,दि १२ (प्रतिनिधी) :** गेल्या आठवड्यापासुन उन्हाच्या झळांनी अकोला जिल्ह्यासह महाराष्ट्र होरपळून निघत आहे. त्यातल्या त्यात तेल्हारा तालुक्यात मोठ्या प्रम णावर उन्ह तापत असल्याने येथील नागरिकांच्या जिवाची घालमेल होत आहे.ग्रामीण भागातून तहसील कार्यालयात आपल्या कामासाठी नागरीक येत असतात त्यांना थंड पाणी पिण्यासाठी मिळावं म्हणून दानापुर येथील मा . सरपंच भोजराज



पालीवाल यांनी तेल्हारा तहसिल कार्यालयात लोकांना पाणी पिण्यासाठी वॉटर कुलर भेट दिले. त्यांच्या या कार्यासाठी तहसिलदार समधान सोनवणे यांनी त्यांच्या सन्मान केला व त्यांना सन्मान पत्र देऊन गौरव केला. यावेळी श्रीमती कावरे निरीक्षक अधिकारी, निलेश कात्रे पुरवठा निरीक्षक, रास्त धान्य दुकान अध्यक्ष जगन्नाथ दुतोंडे,श्री. टोपले, किरण नेमाडे, श्री. फोमारे, श्री, तायडे उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय दाल पकवान व सिंधी भाषा दिन उत्साहात साजरा



**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** सकल सिंधी समाजाचा सिंधी भाषा दिनावर महानगरात आंतरराष्ट्रीय दाल पकवान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्थानिक सिंधी कॅम्पमध्ये गुरुवारी जागतिक सिंधी भाषा दिनावर आयोजित या आंतरराष्ट्रीय दाल पकवान दिनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला सिंधी समुदायाच्या मुख्य पदार्थांपैकी एक दाल पकवान हा नाश्त्यातील एक अतिशय आवडता पदार्थ असून प्रत्येक लहान मूल आणि वृद्ध व्यक्ती व अन्य समुदायांचे लोकही हा पदार्थ खूप आवडीने खातात. जगभरात ११ एप्रिल हा दिवस दाल पकवान दिन म्हणून घोषित करण्यात आला आहे आणि १० एप्रिल हा दिवस सिंधी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. सिंधी समुदायाचा 'तेरे जैसा यार कहाँ' संगीत गृप गेल्या चार ते पाच वर्षांपासून दाल पकवान दिन मोठ्या उत्साहात साजरा करत आहेत. या वर्षीही हा कार्यक्रम सकाळी संत गोदरीवाला धाम, बाबा हरदासराम नगर कच्छी खोली येथे संपन्न झाला, ज्याचा लाभ शेकडो माता, बहिणी, वडीलधारी आणि मुलांनी लाभ घेतला. लिया.या कार्यक्रमात पूज्य सिंधी जनरल पंचायतचे माजी अध्यक्ष कन्हैयालाल रंगवानी, बाबा अरदास रामनगरचे माजी अध्यक्ष भारुमल मुलानी, सोनार पंचायत अध्यक्ष रमेशलाल आलीमचंदानी, ब्रह्म सोनार पंचायत अध्यक्ष मणिभाई जसमतिया, सिंधु सीनियर सिटीजन अध्यक्ष कोडुमल चावला, पूज्य सिंधी जनरल पंचायत उपाध्यक्ष विनोदभाई मनवाणी, शहर पंचायत सदस्य होते.

सुनील जैसवानी, जगदीश रायकेश, सिंधु सीनियर सिटीजनचे सहसचिव अशोक बोधनी, राजू बाबा रेलूसिंघानी, कुलदीप भाई रेलूसिंघानी, साधु पंचायतचे अध्यक्ष श्याम सुंदर व बचलपूरी, शर्मा महाराज,गुलशन महाराज, भाई प्रेम उदासी आदी उपस्थित होते.मान्यवरांनी सिंधी भाषा दिन, दाल पकवान दिन व म्यूजिकल गुप तेरे जैसा यार कहां च्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. आयोजन समितीचे संस्थापक अध्यक्ष हरीश पारवानी यांनी यावेळी या दिनाची माहिती दिली.

## प्राचीन जागेश्वर मंदिराचे नूतनीकरण जोमाने सुरु

**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** द्वितीय शतक पूर्ण करणाऱ्या व गणेशोत्सव मिरवणुकीत सतत द्वितीय क्रमांकाचा मान असणाऱ्या जयहिंद चौक,जुन्या शहरातील भगवान भोलेनाथ तथा माता जोगेश्वरी यांच्या प्राचीन जागेश्वर मंदिराचे नूतनीकरण जोमाने सुरू असून मंदिराच्या विविध नूतनीकरणाचे कामकाज पूर्णत्वास येत आहे.

या मंदिरात सभामंडप,सत्संग हॉल, भोजन कक्ष, प्रसाधन गृह आदीचे नव्याने नूतनीकरण करण्यात येत आहे. बाराशे स्केअर फुटाचा हा सभामंडप स्व शेठ पुरणमल ओंकारमल वर्मा यांच्या स्मृतीत बांधण्यात आला असून यामध्ये भजन, कीर्तन, सभा, संमेलने,विवाह आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या मंदिराची कार्यकारणी नुकतीच गठीत करण्यात आली असून यामध्ये अध्यक्ष म्हणून नानाभाऊ वानखडे, उपाध्यक्ष प्रवीण अग्रवाल, सचिव योगेश शांडील्य,कोषाध्यक्ष श्रीपाद पाथरकर तथा सदस्य म्हणून कमल किशोर वर्मा, गजूभाऊ गोटफोडे आदी कामकाज बघत आहेत. मंदिरात दरवर्षी नवरात्रात भव्य गरबा उत्सव, गजानन महाराज प्रगट दिन, कोजागिरी उत्सव व गणेशोत्सव, भव्य म हाप्रसाद आदी कार्यक्रम साजरे करण्यात येत असतात. तसेच नित्य आरती, जलाभिषेक, पूजा, प्रार्थना होत असतात. मंदिराची नूतन कार्यकरणी आगामी काळात गरजु मुलींचे लग्न, रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिरे व अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करणार आहेत.दरम्यान मंदिर परिसरात असामाजिक तत्त्वांनी हैदोस घातला असून मंदिरात येणाऱ्या महिला, मुलींची छेडछाड, टिंगल, टवाळी करण्यात येत आहे.

तसेच मद्यपान करून सामाजिक अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. गतवर्षीच्या गरबा उत्सवात ही या तत्त्वांनी गोंधळ घातला होता. पोलीस प्रशासनाने या मंदिर परिसरात सुरक्षा व सीसीटीव्ही सारख्या उपाययोजना करण्याची मागणी भक्तांच्या वतीने करण्यात येत आहे.या संदर्भात मंदीराचे विश्वस्त लवकरच पाठपुरावा करणार आहेत.



## पातूर तालुक्यात राष्ट्रवादीची सभासद नोंदणी प्रारंभ

**आ. अमोल मिटकरी यांचे हस्ते औपचारिक उद्घाटन**

**पातुर,दि १२ (प्रतिनिधी):** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पातुर शहर व तालुक्याच्या वतीने सदस्यता नोंदणी अभियानास नुकताच प्रारंभ झाला असून याचे औपचारिक उद्धाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार अमोल मिटकरी यांचे हस्ते पार पडले आहे, या सदस्यता नोंदणीची पातूर शहर व तालुक्यातील जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विद्यार्थी आघाडीचे प्रदेश सचिव प्रा. मोहम्मद फरहान अमीन यांनी घेतली असून पातुर शहरात व तालुक्यात सर्वाधिक सदस्यता नोंदणी करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून आम्ही सर्वजण कामाला लागले. पातुर तालुका व शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बळकट करण्याच्या दृष्टीने शेतकरी कष्टकरी व्यापारी विद्यार्थी युवक महिला यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन विद्यार्थी प्रदेश सचिव राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र फरहान अमीन यांनी केले आहे.

## डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत 'प्रभातच्या' पाच बालवैज्ञानिकांना मेडल्स

**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** दि. १२ एप्रिलः शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा वृत्ती व संशोधन क्षमता विकसित व्हावी यासाठी दरवर्षी मुंबईच्या 'सायन्स टिचर्स असोसिएशन' तर्फे डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. सन २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत प्रभात किड्स स्कूलच्या पाच विद्यार्थ्यांनी गोल्ड व सिल्व्हर मेडल प्राप्त करुन उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

विज्ञानातील अत्यंत सन्मानाचे मेडल्स प्राप्त करर्णायांमध्ये प्रनिल नावकार (वर्ग ९ वा) याने गोल्ड मेडल प्राप्त केले असून अर्जून जायभाये (वर्ग ६ वा), आर्या राठी (वर्ग ९ वा), शुभ पटेल (वर्ग ९ वा) आणि शरयू राऊत (वर्ग ९ वा) या विद्यार्थ्यांनी सिल्व्हर मेडल प्राप्त केले आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी अमित जोशी, शुभम डांगे, योगेश सचवाणी आणि विशेष सहकार्य विज्ञान विभाग प्रमुख मिता इंगळे व संचालक मंडळ सदस्या व्ही. अनुराधा यांनी मार्गदर्शन केले.डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रभात किड्स स्कूलचे संस्थापक संचालक, डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, प्राचार्या सौ. वृषाली वाघमारे, उपप्राचार्या सौ. अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, सिनिअर कॉर्डिनेटर मो. आसिफ जारियावाला आणि सीबीएसई कोऑर्डिनेटर प्रशांत होळकर यांनी कौतुक केले आहे.

## भगवान महावीर जन्महोत्सवाच्या पूर्व संध्येला झाला बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम







**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** येथील श्री वर्धमान स्थानक वासी जैन श्रावक संघ शास्त्रीनगर अकोला आणि ज्ञान शाळेच्या संयुक्त विद्यमाने भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाच्या पूर्व संध्येला बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.शास्त्रीनगरातील श्री वीर हनुमान मंदिराच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमात भगवान महावीर यांचा जीवनपट आणि त्यांची शिकवण नृत्य आणि नाटिकांच्या माध्यमातून सादर करण्यात आली. यावेळी भगवान महावीर यांची भूमिका केयूर झांबड,केवल झांबड, विवान बलदोटा आणि प्रेरक खाबिया यांनी साकार केली.वर्षीदानाचे दृश्य विरम संकलेचाने सादर केले. महिला मंडळाने भगवान महावीर यांच्या जन्मापूर्वी त्रिशला मातेला पडलेल्या १४ स्वप्नांचे सादरीकरण केले. ज्ञान पाठशालेच्या ४५ विद्यार्थी आणि विद्यार्थींनींनी या सांस्कृतिक सोहळ्यात सहभाग घेतला. यावेळी १५ विद्यार्थांना उत्कृष्ट सामायिक आणि उत्कृष्ट प्रतिक्रमण आत्मसात केले म्हणून मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. यावेळी श्री वीर हनुमान मंदिराच्या ट्रस्टींचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे बहारदार संचालन तेजस संकलेचा,प्राची देशलहरा आणि अरिहंत खाबिया यांनी केले. आभार प्रदर्शन खुशी कोठारी हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. प्रिया संकलेचा, जितेश संकलेचा आणि त्यांच्या चमूने अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला ४०० पेक्षा जास्त भाविक उपस्थित होते. महावीर जन्म कल्याणकाच्या दिवसी श्री वर्धमान स्थानक वासी जैन श्रावक संघ आणि वासुपूज्य जिनालय यांचे संयुक्त विद्यमाने शास्त्रीनगरातून सिव्हिल लाईन चौक, पोस्ट ऑफीस, बस स्टँड या मार्गाने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. गांधी चौकात ही शोभायात्रा मुख्य शोभायात्रेत सम्मिलित झाली.

## ज्येष्ठ पत्रकार किर्तीकुमारजी वर्मा यांचे निधन

आकोट- येथील ज्येष्ठ पत्रकार कितीकुमारजी वर्मा सर (८१) यांचे शनिवार १२ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास इंदौर-देवास येथे वृध्दापकाळाने निधन झाले ते गेल्या काही महिन्यापासुन देवास येथे मुलाकडे वास्तव्यास होते.



कितीकुमारजी वर्मा सर रा.स्व.संघाचे स्वयंसेवक होते त्यांनी संघाच्या विविध पदावर कार्य केले,त्यांचा शहरातील अनेक सामाजीक संघटनांशी संबध होता ते येथील श्री सरस्वती विद्यालयातुन शिक्षक पदावरुन सेवानिवृत्त झाले होते,त्यांनी दै तरुण भारत वृत्तपत्रामध्ये दोन,अडिच दशके प्रतिनीधी म्हणुन काम केले होते ते आकोट तालुका पत्रकार संघाचे मार्गदर्शक होते,त्यांच्या मागे दोन मुले,मुलगी,सुना नातवंड असा बराच मोठा आप्तपरीवार आहे त्यांचेवर रविवार १३ एप्रिल रोजी देवास येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.




# मिळावी संस्कारांची शिदोरी

**सध्या शाळा बंद असल्यामुळे मुलं घरीच आहेत. त्यातच आईवडीलही घरूनच काम करत आहेत. सर्वच मंडळांनी दहावीच्या परीक्षा रद्द केल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकही निवांत आहेत. आता या निवांत आणि तणावविरहित काळाचा सदोपयोग करण्याचा प्रयत्न व्हायला हवा. मुलं दिवसभर घरात असताना त्यांच्याशी संवाद साधण्याचा, त्यांना मूल्यशिक्षण देण्याचा, स्नेहबंध दृढ करण्याचा प्रयत्न या काळात व्हायला हवा. हे साधलं तर खूप काही मिळेल याची खात्री वाटते.**

भक्ती विशेष

स्वाती पेशवे

मार्च–एप्रिल महिने विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे असतात. वर्षभर केलेल्या अभ्यासाचं मूल्यमापन केवळ काही दिवसांत होणार असतं. दहावी–बारावीसह इतर इयत्तांच्या परीक्षांचा हा काळ विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक अशा सर्वांचीच परीक्षा घेण–ारा... हा काळ संपला की जणू घरदार सुस्कारा सोडत असल्याचा भास होतो. घरोघरी विद्यार्थी नव्हे तर परीक्षार्थी भरलेले असताना यापेक्षा दुसरं काही घडण्याची अपेक्षाही नाही. आजच्या स्पर्धात्मक काळात जगण्याची जद्दोजहद विलक्षण गुंतागुंतीची आणि कठीणप्राय बनत असताना आपल्या अपत्याने कशातही मागे राहू नये ही कामना उरी धरुन पालक मुलांना एक ना अनेक उपक्रमांमध्ये, अभ्यासक्रमांमध्ये गुंतवत राहतात आणि 'मुकी–बिचारी कोणीही हाका' या न्यायाने आई–बाबांच्या हातातील खेळणं असणारी मुलं मुकाटपणे 'शिक्षणकामगार' बनून पुस्तकात डोकं खुपसून शिकत राहतात. त्यातलं त्यांना किती कळतं, त्यांच्या किती संकल्पना स्पष्ट होतात, यातून जगण्यास पुरक आणि चरितार्थास कारक अशी कोणती विद्या मिळते हे प्रश्न बाजूलाच पडतात. पण या सगळ्या जंजाळात वर्षातील १० महिने एका साचेबद्ध आणि झापडबंद अवस्थेत जातात हे मात्र कोणीही नाकारणार नाही. एकीकडे पालक पळत राहतात तर दुसरीकडे विद्यार्थी... अशा अवस्थेत घर म्हणजे लॉजिंग–बोर्डिंगला पर्यायी व्यवस्था झाल्यासारखी परिस्थिती अनेक ठिकाणी बघायला मिळते. आणि जिथे सह–वासच नसेल तिथे संस्कार कुठून येणार हा स्वाभाविक प्रश्न समोर येतो. जग कितीही पुढे गेलं, अत्याधुनिकतेचं वार घराघरात शिरलं, हे वारं शिडात भरुन युवा पिढी देशांतराला निघाली तरी त्यात संस्कारांची शिंपण नसेल तर मार्ग भरकटायला वेळ लागत नाही हे अनेकानेक उदाहरणांवरुन समोर आलेलं आहे. मुख्य म्हणजे संस्कारांअभावी भरकटलेली तरुणाई किती टोकाचे नकारात्मक विचार कुरवाळत स्वत:चा सर्वनाश करुन घेते, त्यांच्यात किती प्रकारच्या विकृती जन्म घेऊ शकतात, प्रलोभनांच्या जाळ्यात अडकून ते किती खालची पातळी गाठू शकतात, भौतिकवादाची आसक्ती एखाद्याला किती दयनीय अवस्थेपर्यंत पोहोचवू शकते हे सर्व आपण आजूबाजूलाच पहात असतो, ऐकत असतो. त्यामुळे घरातील सर्व सदस्यांना सहव–ासाचं सुख मिळवून देणाऱ्या, चार भिंतींचा गाभारा गजबजवून टाकणाऱ्या या काळाचा सदुपयोग करण्याचं धोरण घरोघरी आखलं जायला हवं.

कोरोनामुळे गेली वर्षभर मुलं घरीच आहे. ऑनलाईन अभ्यास सुरू असला तरी तशी मोकळीक आहे. त्यातच यंदा दहावीच्या परीक्षा रद्द झाल्या आहेत. इतर इयत्तांम धल्या मुलांना उत्तीर्ण करून वरच्या वर्गात पाठवण्यात आलं आहे. त्यामुळे सगळं कसं निवांत आहे. उन्हाळी सुट्टी लागल्यानंतरही यंदा शिबिरं, भटकंती, कॅम्प्स असं काहीही नाही. अर्थात ऑनलाईन शिबिरं, कार्यशाळा, छंदवर्ग आहेतच. प्रत्येक सुट्टीत मुलांसाठी भटकंती, शिबिरं, अभ्यासेतर उपक्रम, खेळवर्ग, छंदवर्ग यासारख्या भरगच्च कार्यक्रमांची आखणी होत असते. यंदा फक्त ती घरून असेल इतकंच! मुलं दिवसभर कशात तरी गुंतून रहावीत या हे–तूने बरेच पैसेही मोजले जातात. पण या सर्वात त्यांना नेमकं काय मिळतं याचाही कधीतरी विचार करायला हवा. याबरोबरच मूल्यशिक्षणासाठी, परस्परांमधील नातं दृढ होण्यासाठी, मुलांना संस्कारित करण्यासाठी या काळाचा कशाप्रकारे सदुपयोग करुन घेता येईल याचंही नियोजन सुट्टीपूर्वी व्हायला हवं. कोरोना काळ संपला की पुन्हा सगळं नेहमीसारखं होऊ लागेल. सध्या पालकांनी व्यस्त दिनक्रमातून थोडा वेळ मुलांसाठी काढायला हवा. पालकांनी मोबाईल बाजूला ठेऊन मुलांसोबत गप्पा मारायला हव्यात. तसंच भविष्यात मुलांच्या सुट्टीच्या काळात रजा घेऊन काही दिवस घरी थांबण्याचा विचार करावा.



भटकंतीचे दिवस वगळून घरी एकत्र थांबण्याच्या दृष्टीने हे नियोजन व्हावं.

सहवासाने प्रेम वाढतं. मग ते प्रेम पालक आणि अपत्यामधील असेल, नातलगांबाबतच असेल, सोसायटीतील शेजाऱ्यांबद्दलचं, मित्रमैत्रिणींमधलं असेल... या सर्वांच्या दृष्टीने हा काळ महत्त्वपूर्ण ठरतो. या काळात मुलांना या सर्वांचं सानिध्य मिळावं. त्यांच्याशी मनमोकळा संवाद व्हावा. आपल्यातील अनेक जण विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असतात. एखाद्याकडे विविध विषयांचं समृद्ध ज्ञान असू शकतं. एखाद्याकडे विविध्यपूर्ण वस्तूंचा संग्रह असू शकतो. कोणी आपल्या टेरेसवर छानशी ऑर्गेनिक बाग फ ुलवलेली असते. त्या बागेत रसरशीत भाज्या आणि फुलांचे घोस फुललेले असतात. कोणी रेन वॉटर हार्वेस्टिंगचा प्रयोग यशस्वी केलेला असतो. कोणी सोलर एनर्जीचा वापर करुन घरातील यंत्रणेत आमुलाग्र बदल केलेला असतो तर कोणी अशाच एखाद्या अनोख्या पद्धतीने आयुष्याला वेगळ्या वळणावर ने–लेलं असतं. सध्या विचारांची कवाडं विस्तारली आहेत. नानाविध वाटा उपलब्ध झालेल्या आहेत. कारकुनी छापातून बाहेर पडलेला मध्यमवर्ग वाईल्डलाईफ फोटोग्राफी, ओरोगामी, योगा, फ ूड प्रोसेसिंग, डिझायनिंग आदी एक ना अनेक प्रांतात मुशाफिरी करु लागला आहे. पण हे सगळं ज्ञान, यासंबंधीचे वृत्तांत घरातच अडकून पडले तर करिअर कौन्सिलिंगसाठी तुडुंब गर्दी होणारंच. खरं तर गप्पांच्या ओघात, सहज संवाद साधताना हे ज्ञान आपोआप कानी पडतं. याचं प्रात्यक्षिक बघायला मिळतं. एखाद्या ज्ञानाचा व्यवहारात कसा उपयोग होतो याची मूर्तीमंत उदाहरणारं असणारी ही माणसं त्या त्या क्षेत्रातील छोटेखानी विश्वकोश असतात असंही आपण म्हणू शकतो. त्यामुळे केवळ शिबिरांच्या बंदिस्त कोंडवाड्यातच नव्हे तर गप्पांच्या या मोकळ्याढाकळ्या प्रांगणात व्यक्तिमत्त्व विकासाला पुरक असणारी अनेक प्रकारची माहिती मिळवता येते.

आपण यंत्रांच्या सानिध्यात रहात असलो तरी आपण यंत्रमानव नाही. आपल्या बुद्धी आणि भावनेला कृत्रिमतेची झालर अद्याप तरी जोडली गेलेली नाही. अजूनही मन नावाच्या निराकार अवयवाचं अस्तित्व आपण मान्य करतो. म्हणून या मनावर संस्कारांची, सुविचारांची शिंपण करणं हे प्रत्येकाचं कर्तव्य ठरतं. ही शिंपण करण्याचा यापेक्षा सर्वोत्तम काळ तो कुठला?


# महत्त्व अखंड ज्योतीचं...

जाणून घ्या

चैत्र महिन्याची सुरुवात एका आनंदी वातावरणाने होते. या महिन्यात अनेकांच्या घरात चैत्रगौरीचं आगमन होतं. देवीची आराधना होते. देवीची आराधना करताना अनेक घरांमध्ये अखंड ज्योत लावली जाते. या दिवसात दिवा तेवता ठेवला जातो. इतर अनेक प्रसंगांमध्येही घरात अखंड ज्योत लावली जाते. अखंड ज्योत लावण्यामागचा उद्देश आणि महत्त्व आपण जाणून घेऊ या...

* देवी दुर्गेची अनेकविध रूपं आहेत. दुर्गा देवीच्या प्रत्येक रूपाप्रतीचा भक्तीभाव या अखंड ज्योतीच्या माध्यमातून व्यक्त होतो. देवी दुर्गा प्रेमळ आहे. ती आपल्या भक्तांना जवळ घेते. मायेची ऊब देते. दुसरीकडे ती रणरागिणी, चंडिकाही बनते. दुष्टांचा संहार करण्यासाठी ती कालीमाताही होते. हा अग्नीही याचंच प्रतीक आहे. अग्नी तुम्हाला ऊब देतो तर दुसरीकडे जाळून भस्म ही करू शकतो.

* अखंड ज्योत हे आशास्थान मानलं जातं. या ज्योतीप्रमाणे आपणही आयुष्यात कधी हार मानू नये. अडचणींमुळे निराश, हताश होऊ नये. ही छोटी ज्योत अंधार दूर करते, आपल्याला प्रकाशाची वाट दाखवते त्याचप्रमाणे आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची क्षमताही आपल्यात आहे असा संदेश ही ज्योत देते. ही ज्योत याचंच प्रतीक म्हटलं पाहिजे.



* भक्तीमार्गाला लागल्यामुळे तुमच्या आयुष्यात प्रकाश निर्माण होईल. तुमचं जीवन आनंदाने उजळून जाईल. तुमच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश निर्माण होईल.

* अखंड ज्योतीचा संकल्प केला असेल तर ती सतत तेवत रहायला हवी. ही ज्योत दिवसरात्र तेवत ठेवायला हवी.

* अखंड ज्योत तेवत असलेल्या घरावर देवी दुर्गेची कृपा राहते, असं मानलं जातं. घरात उत्साही आणि आनंदी वातावरण राहतं. वाईट शक्तींचा प्रभाव टिकू शकत नाही.

* अखंड ज्योतीचा संकल्प केल्यास आपल्या मनात कधीही नकारात्मक विचार येत नाहीत.

* अखंड ज्योत तेवत असेल तर घरात नकारात्मक शक्तींचा प्रभाव टिकून रहात नाही.

# बना चारित्र्यसंपन्न

बोध

माणसाला प्रतिष्ठा कशामुळे प्राप्त होते, असा प्रश्न अनेकदा पडत असतो. पद, पैसा, प्रसिद्धी यापेक्षाही विनम्रभाव, औदार्य आणि कर्तव्यदक्ष असणं अधिक महत्त्वाचं मानलं जातं. या गोष्टी माणसाला प्रतिष्ठा मिळवून देतात. व्यक्तीच्या चारित्र्यावरून त्याची ओळख पटते. चारित्र्यशील व्यक्तीचा आदर केला जातो. गमावलेलं धन, संपत्ती परत येऊ शकते पण चारित्र्यहनन झाल्यानंतर आपल्या हाती काहीही रहात नाही. धन, यश आणि विद्वत्ता यापैकी कशालाही चारित्र्याची सर येऊ शकत नाही. प्रत्येक जण चारित्र्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करत असतो. यातूनच त्याच्या महानतेचं दर्शन घडत असतं.

चारित्र्याशिवाय व्यक्तीच्या आयुष्याला काहीही अर्थ नाही. चारित्रहीन व्यक्ती म्हणजे पाठीचा कणा नसलेल्या शरीराप्रमाणे आहे. स्वामी विवेकानंदांनी चारित्राचं वर्णन नेमक्या शब्दात केलं होतं. स्वामीजी कायम भगवी वस्त्र परिधान करत असत. यावरून एका परदेशी व्यक्तीने त्यांना विचारलं की, फक्त भगवं वस्त्र लपेटण्याची तुमची ही कोणती संस्कृती आहे? त्यावर ते म्हणाले की, तुमची संस्कृती आमच्यापेक्षा खूप वेगळी आहे. तुमची संस्कृती शिंप्यामुळे घडत असली तरी आमचं असं



नाही. इथे चारित्र्याला महत्त्व आहे, पेहरावाला नाही. आपल्या विचारांवरून चारित्र घडत असतं. व्यक्तीच्या विचारांवर बरंच काही अवलंबून असतं. म्हणूनच चारित्र घडवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी विचार बदलणं आत्यंतिक गरजेचं असतं.

ज्ञान म्हणजे माहिती नाही, शिक्षणही नाही तर आत्मज्ञान सर्वाधिक महत्त्वाचं आहे. आपण कोण आहोत, या जगात आपण कशासाठी आलोय, हे सगळं आत्मज्ञानाद्वारे आपल्याला कळतं. आत्मज्ञान मिळवलेला मनुष्य सगळ्या बंधनातून मुक्त होतो. आत्मज्ञान अमृतासमान मानलं जातं. आत्मज्ञान झाल्यानंतर व्यक्तीचा 'मी' पणा, अहंकार गळून पडतो. तो माणूस महान बनतो. त्याला जीवनाचा खरा अर्थ कळतो. एवढ्या मोठ्या ब्रह्मांडात आपलं कोणतंही अस्तित्त्व नाही, याची जाणीव झाली की माणसाचे पाय जमिनीवर राहतात. त्यामुळे अहंकार त्यागण्यातच प्रत्येकाचं भलं आहे.

# संस्कारातून घडतं आयुष्य

सेल्फ हेल्प

सुशिक्षित मनुष्य सुसंस्कृत असतोच असं नाही. सुसंस्कृतता ही विचारांमधून प्रगट होत असते. संस्कारांमधूनच तुमचं आयुष्य घडत असतं. शिकलेला मनुष्य दुरा–चारी असेल तर त्याचा समाजाला काहीही उपयोग होत नाही. याबाबतीत काही डॉक्टरांचं उदाहरण घेता येईल. डॉक्टरी पेशा स्वीकारल्यानंतर भरपूर पैसा कमावण्याच्या उद्देशाने काही लोक चुकीचा मार्ग अवलंबतात. गर्भलिंग परिक्षण करून स्त्रीभ्रूणहत्या केली जाते. सुशिक्षित असूनही ही मंडळी चुकीच्या गोष्टी करायला धजावतात. प्राचीन काळात डोकवायचं तर रावण हा याचं उदाहरण म्हणता येईल. रावण शिवभक्त होता. त्याच्यात अनेक गुण होते. पण तो अहंकारी होता. त्याला सर्वश्रेष्ठ बनायचं होतं. अखेर या लालसेने त्याचा घात केला. त्याचा अहंभाव पायदळी तुडवला तो वानरांसह लढणाऱ्या रामाने...



आज आपण मुलांना शिक्षण देण्यासाठी झटतोय. महागड्या शाळांची निवड करतोय. पण शिक्षणाबरोबरच संस्कारांनाही महत्त्व आहे हे आपण विसरतो. संस्कार नसतील तर आयुष्याला काहीच अर्थ उरणार नाही. अशी म ाणसं समाजासाठी घातक ठरतील. उच्चशिक्षित असणारी काही मंडळी बिनदिक्कत भ्रष्टाचार करतात. हाताखालच्या माणसांचं शोषण करतात. हे टाळण्यासाठी आपल्या मुलांना बालपणापासूनच चांगले संस्कार दिले पाहिजे. श्रीरामाने रावणाला हरवलं ते नैतिकतेच्या बळावर... रावणाकडे सामर्थ्य होतं तर रामाकडे आत्मबल होतं. स्वत:वरचा विश्वास होता आणि महत्त्वाचं म्हणजे नैतिकता होती. याच गोष्टी त्याच्या मदतीला आल्या. परमेश्वराचा अंश असूनही तो मातला नाही. त्यामुळे हा आदर्श समोर ठेवत प्रत्येकाने संस्कारांना महत्त्व दिलं पाहिजे. संस्कारांमुळे समाज घडतो हे लक्षात ठेवलं पाहिजे.

# ...तर होतो संपत्तीचा ऱ्हास

वास्तू


वाढती महागाई, वाढलेल्या गरजा यामुळे प्रत्येक माणूस पिचला आहे. हातात आलेला पैसा संपायला वेळ लागत नाही. महिन्याच्या सुरूवातीला मिळालेला पगार महिना संपेपर्यंत पुरत नाही. अनेकदा नको त्या ठिकाणी पैसा खर्च होतो. हे अनावधानाने होतं किंवा खर्चावरचं नियंत्रण आपल्या आवाक्यात नसतं. अशा वेळी पैशांची बचत करायची असेल तर वास्तूशास्त्रातल्या काही टिप्स तुमच्या मदतीला येऊ शकतील.

* धन ठेवण्याच्या स्थानाला खूप महत्त्व आहे. घरातलं कपाट किंवा तिजोरीचं तोंड उत्तर दिशेला असलं पाहिजे. यामुळे धनवृद्धी होते.

* घरातला एखादा नळ गळत असेल तर तो दुरूस्त करा. गळक्या नळातल्या पाण्याप्रमाणे तुमची संपत्ती किंवा पैसाही वाहून जातो.

* घरात तुटकी–फुटकी भांडी ठेऊ नये. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जेचा वास राहतो. तुटलेल्या भांड्यांम ुळे घरात समृद्धी, संपन्नता येत नाही. धनात वृद्धी होत नाही.

* घरातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचं स्थान घराच्या दक्षिण आणि पश्चिम दिशेला असलं पाहिजे. यामुळे आर्थिक चणचण जाणवणार नाही. तसंच आर्थिक समस्यांपासून मुक्तता मिळू शकेल.



# का कमी होतं आयुष्य?

पुराणांमधून...



हिंदू धर्मात विविध पुराणं, उपनिषदं आहेत. या धर्मग्रंथांमध्ये जीवनाविषयीची अनेक रहस्य नमूद करण्यात आली आहेत. हिंदू धर्मातल्या १८ पुराणांपैकी एक म्हणजे गरूड पुराण. यात जगण्याच्या काही रहस्यांबद्दल सांगण्यात आलंय. आयुष्य कमी करणाऱ्या काही गोष्टी आपण कळत नकळत करत असतो. याबाबत गरूड पुराणात नमूद करण्यात आलं आहे. यासंबंधी जाणून घेऊन थोडी काळजी घेतली तर अपमृत्यूचं भय बऱ्याच अंशी कमी होऊ शकेल.

* पुराण आणि आयुर्वेदानुसार माणसाने ब्राह्ममुहूर्ताला उठलं पाहिजे. सकाळी उठण्याचे अनेक लाभ आहेत. ब्राह्ममुहूर्ताला उठल्यामुळे आपल्याला सकाळची शुद्ध हवा मिळते. याचे शरीरावर सकारात्मक परिणाम होतात. उशीरा उठल्यामुळे ताजी हवा मिळत नाही आणि अनेक रोग शरीरात प्रवेश करतात.

* सूर्योदयानंतर उठल्याने शरी–राची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. याम ुळे आयुष्य कमी होऊ शकतं असं गरूड पुराणात नमूद करण्यात आलं आहे.

* गरूड पुराणानुसार रात्रीच्या वेळी दही खाणं निषिद्ध मानण्यात आलं आहे. यामुळे विविध प्रकारचे विकार जडू शकतात.

* मांसाहार करताना काळजी घ्यायला हवी. शिळं मांस खाऊ नये. याम ुळे शरीरात रोग निर्माण होतात, असं गरूड पुराण सांगतं.

* सकाळच्या वेळी व्यायाम करण्याविषयी गरूड पुराणात आग्रह धरण्यात आला आहे.

* मृत्यूनंतर शरीर जाळलं जातं. शरीर जळताना निर्माण होणाऱ्या धुराच्या संपर्कात आल्याने शरीरात विषाणूंचा प्रवेश होतो. यामुळे विविध रोग होतात. म्हणूनच अशा धुराच्या संपर्कात न येण्याची काळजी घ्यायला हवी.

# कुठे आहेत ही शक्तीपीठं?

तीर्थक्षेत्र

**अनेक धर्मग्रंथांमधून आदिशक्तीचा महिमा वर्णन करण्यात आला आहे. हिंदू धर्मानुसार देवीची ५१ शक्तिपीठं मानली जातात. देवी सतीच्या मृत शरीराचे भाग ज्या ज्या स्थानी पडले ती स्थानं शक्तिपीठं म्हणून ओळखली जाऊ लागली. त्यापैकी १८ स्थानांना महाशक्तिपीठं असं म्हटलं जातं. देवीच्या ५१ शक्तिपीठांपैकी ४ शक्तिपीठांबाबत कोणतीही माहिती नाही. या शक्तिपीठांचा उल्लेख असला तरी ती नेमकी कुठे आहेत, कोणत्या अवस्–थेत आहेत याबाबत काहीही सांगता येत नाही.**



सतीमातेचा खांदा पडलेलं ठिकाण रत्नावली शक्तिपीठ या नावाने ओळखलं जातं. सतीमातेचा खांदा चेन्नईच्या आसपास पडला होता, असा अंदाज धर्मग्रंथांमधल्या उल्लेखांचा अभ्यास करुन लावला जातो. पण हे शक्तिपीठ नेमकं कुठे आहे, याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

* कालमाधव या नावाचं एक शक्तिपीठ आहे. या स्थानी देवी सती कालमाधव रूपात आणि भगवान शंकर असितानंदाच्या रूपात विराजमान असल्याचं मानलं जातं. या स्थानी सतीमातेच्या शरीराचा मागचा भाग पडल्याचं बोललं जातं. या स्थानाचा शोध अद्याप लागलेला नाही.

* धर्मग्रंथांमध्ये लंका शक्तिपीठाचा उल्लेख आढळतो. पण हे स्थान नेमकं कोठे आहे याबाबत कोणतीही माहिती नाही. या स्थानी देवी सतीचा दागिना पडल्याचं सांगितलं जातं. इथे सतीला इंद्राक्षी तर शिवाला रक्षेश्वर असं म्हटलं जातं.

* शास्त्रांमध्ये पंचसागर शक्तिपीठाचा उल्लेख करण्यात आला आहे. या स्थानी देवी सतीच्या जबड्याचा भाग पडल्याचं बोललं जातं. या स्थानी असलेली देवी वरही या नावाने ओळखली जाते. पण हे स्थान नेमकं कुठे आहे, याबाबत कोणतीही माहिती नाही.

# दैनिक महासागरच्या वतीने कर्मयोगी पुरस्काराचे नुकतेच वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाची काही क्षणचित्रे























## मिनी ट्रकची दोन दुचाकीला धडक

# एकाचा जागीच मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १२ :

विटांची वाहतूक करणाऱ्या मिनी ट्रकने दोन दुचाकींना जबर धडक देऊन विचित्र अपघात झाल्याची घटना बार्शिटाकळी तालुक्यातील रेडवा टी-पाईंटजवळ शनिवारी घडली. या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून सात जण जखमी झाले आहेत. त्यातील चार जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. या अपघातामुळे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

बार्शिटाकळी तालुक्यात रेडवा टी-पाईंटजवळ चोहट्टा बाजार येथील विटांची अवजड वाहतूक करणाऱ्या भरधाव मिनी ट्रकने (क्रमांक एमएच २८ एच ९६४६) विरूद्ध दिशेने येणाऱ्या दोन दुचाकींना जबरदस्त धडक दिली. अपघातानंतर हा मिनी ट्रक रस्त्याच्या बाजूला जाऊन झाडावर आदळला. मिनी ट्रकच्या जोरदार धडकेत एका दुचाकीस्वाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मिनी ट्रक चालक व ट्रकमधून वाहतूक करणारे मजूर ट्रकमधील विटांखाली दबल्याने जखमी झाले. दुचाकीवरील इतर जण देखील जखमी झाले. मृतकाची ओळख पटली नव्हती. या भीषण अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

रुग्णवाहिकांमधून मृतकासह सात जखमींना उपचारार्थ अकोल्यातील सर्वोपचार रुग्णालयात पाठवले. जखमींपैकी चार जणांची प्रकृती गंभीर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. काहींना उपचारार्थ खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या अपघातामुळे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहते रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. बार्शिटाकळी पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. अपघात नेमका कसा घडला, याचा तपास पोलीस करीत आहेत.

जिल्ह्यात अवैध वाहतुकीचे प्रमाण वाढले. त्यामुळे अपघाताची संख्या देखील वाढल्याचे चित्र दिसून येते. बार्शिटाकळी तालुक्यातील दोनद येथे यात्रा महोत्सव सुरू आहे.

# नागपूर शिक्षण विभागात मोठा घोटाळा

## ५८० बोगस शिक्षकांच्या नियुक्त्या करून कोट्यवधींचा गैरव्यवहार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :

नागपूर शिक्षण विभागात मोठा आर्थिक घोटाळा उघडकीस आला आहे. बनावट शालार्थ आयडीच्या आधारे अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनासाठी पात्र ठरवून शासनाची कोट्यवधींची फसवणूक करण्यात आली आहे.

शिक्षण उपसचिवांच्या चौकशी अहवालानुसार नागपूर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये २०१९ पासून सुमारे ५८० बोगस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या प्रकरणात वेतन व भविष्य निर्वाह निधी अधीक्षक नीलेश वाघमारे यांना निलंबित करण्यात आले आहे.

शालार्थ पोर्टलवरील त्रुटींच्या आधारे हा गैरव्यवहार उघडकीस आला. शिक्षण उपसचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानंतर कारवाई सुरू झाली आहे. या प्रकरणात आणखी काही वरिष्ठ अधिकारी गुंतले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

निलंबन काळात वाघमारे यांना जिल्हा परिषद मुख्यालय सोडता येणार नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय त्यांना कोणतीही हालचाल करता येणार नाही. या काळात त्यांना खाजगी नोकरी किंवा व्यवसायही करता येणार नाही. शिक्षक संघटनांनी वाघमारे यांच्याविरुद्ध अनेक तक्रारी केल्या आहेत. त्यांनी मुख्याध्यापकांना चुकीच्या सूचना दिल्याने वारंवार पगार बिल बदलावे लागले. यामुळे शिक्षकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला. शिक्षक संघटनांनी त्यांच्याकडून वेतन पथक अधीक्षकाचा कार्यभार काढण्याची मागणी केली होती.

# बुलढाणा जिल्ह्यात उष्मघाताचा पहिला मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १२ :

शेगाव मधील एका विद्याथ्यार्ची उष्माघाताने गेल्याची जोरदार चर्चा शेगावात होत आहे. संस्कार सोनटक्के असे या विध्यार्थ्याचे नाव असून ११ वर्षीय विद्यार्थी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराज ज्ञानपीठ मध्ये इयत्ता सहावीमध्ये शिकत होता. यामुळे आरोग्य यंत्रणेसह जिल्हा प्रशासन देखील हादरले आहे. संस्कार सोनटक्के या विद्यार्थ्यार्ला उन्हाचा फटका बसला. त्यात त्याची तब्येत गंभीर झाली असता उपचारासाठी त्याला अकोला येथे घेऊन जात असताना वाटेतच त्याचा दुर्देवी मृत्यू झाला. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यात उष्मघाताचा पहिला बळी गेला आहे बुलढाणा जिल्ह्यात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून त्याचा थेट फटका हा शाळकरी विद्यार्थ्यांना बसत आहे.

# मंगेशकर कुटुंबीयांना पैसाच हवा : विजय वडेट्टीवार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर धर्मदाय रुग्णालयात एका महिलेचा मृत्यू झाल्याचा तिसरा अहवाल आणि एकूणच रुग्णालयाचे व्यवस्थापन आणि मंगेशकर कुटुंबीयांवर टीकेची झोड उठत आहे. काँग्रेसचे विधीमंडळाचे पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी तर पैसे दिल्याशिवाय उपचार न करणारे रुग्णालय धर्मदाय कसे, असा प्रश्न केला. तसेच मंगेशकर कुटुंबीय पैसे घेतल्याशिवाय कोणतेच काम करत नाही, अशी टीकाही केली.

वडेट्टीवार शनिवारी पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, अहवालानुसार वेळीच त्या महिलेवर उपचार झाले असते तर तिचा जीव वाचला असता, मी मंगेशकर रुग्णालय आणि मंगेशकर कुटुंबीयांबद्दल केलेल्या वक्तव्यावरून टीका केली जात आहे. परंतु, मी त्याची पर्वा करत नाही. सत्य जगासमोर कधीतरी आलेच पाहिजे.



थोर समाजसेवक प्रकाश आमटे कर्करोगाच्या उपचाराकरिता दीनानाथ रुग्णालयात दाखल झाले. त्यावेळी त्यांच्याकडून एक रुपयाही घेणार नाही, असे रुग्णालय व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले होते. महाराष्ट्र भूषण, थोर समाजसेवकालाही दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने सोडले नाही तर साधारण कुटुंबाची काय, याकडेही वडेट्टीवार यांनी लक्ष वेधले.

वडेट्टीवार यांनी दिवंगत लता मंगेशकर यांच्याबद्दलही वक्तव्य केले. ते म्हणाले, विदर्भ साहित्य संघाच्या कार्यक्रमात लता मंगेशकर यांनी नागपुरात मोफत गायन करण्याचे आश्वासन दिले होते. साहित्य संघाने तयारी करून त्यांच्याशी संपर्क साधला, तेव्हा तिथून निरोप आला की, पंचतारांकित हॉटेलमध्ये आमची सोय करा.

त्यासाठी २२ लाख रुपयांचा खर्च सांगण्यात आला. या रकमेचा धनादेश देण्याची तयारी विदर्भ साहित्य संघाने दर्शवली. परंतु, मंगेशकर यांनी धनादेश घेण्यास नकार दिला आणि रोख रकमेचा आग्रह धरला. आम्ही संस्था असल्याने रोख रक्कम देणे शक्य नाही, असे विदर्भ साहित्य संघाने सांगितले. त्यानंतर लता मंगेशकर यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी हृदयनाथ जसे सांगत आहेत तसेच करा, असे सांगितले. अखेर तो कार्यक्रमच रद्द करावा लागला. एका खासदाराने साहित्य संमेलनात येण्यासाठी लता मंगेशकर यांना निमंत्रण दिले होते. तेव्हा त्यांनी संमेलनात येण्यासाठी दोन लाख रुपये मागितले. त्या खासदाराने ते पैसे दिले. कार्यक्रमाची तारीख जवळ आली, परंतु ऐन वेळेवर आणखी तीन लाख रुपये मागितले गेले. तत्कालिन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यासमोर गायनाचा कार्यक्रम ठरला होता.

## ६ लाखांच्या दागिन्यांवर डल्ला

**नागपूर :** एका महिलेला बाहेरगावी जाणे चांगलेच महागात पडले. अज्ञात आरोपीने घरफोडी करून त्यांचे ६ लाख रुपये किंमतीचे दागिने चोरून नेले. ही घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत दाभा परिसरात घडली. पोलिसांनी कविता अशोक झाडे (५५) रा. भोंगाडे लेआऊट, शिवनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. कविता यांचा मुलगा आणि सून मुंबईला राहतात, तर मुलगी नोकरीनिमित्त पुणेला आहे. त्यांच्या आईची प्रकृती बरी नसल्याने गत ७ एप्रिल रोजी कविता घराला कुलूप लावून चंद्रपूरला गेल्या होत्या. या दरम्यान चोरांनी मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून ६६ ग्रॅम सोने आणि १ किलो चांदीचे दागिने चोरून नेले.